# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा दि. २७/०३/२००८

**लालबहादुर शास्त्री स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,**
दि. २७/०३/२००८

आज गुरूवार दि. २७/०३/२००८ रोजी स्थायी समितीची सभा सुचना क्र. १३ दि. १७/०३/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहादुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी **मा. सभापती, श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स** हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ११) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| १२) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १३) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १४) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १५) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १६) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य / सदस्या, मनपा अधिकारी व कर्मचारी वर्ग. आपले सर्वांचे मी हार्दिक स्वागत करुन ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास सहकार्य करावे अशी मी सर्वांना विनंती करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

**नगरसचिव :-**

या सुचनेव्दारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. २७/०३/२००८ रोजी दूपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादूर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १३, दि. १७/०३/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. मागील सभांचे इतिवृत्तांत, निरंक. परिवहन व विशेष समित्यांचे ठराव, निरंक. आयुक्तांकडील पत्रे व कामकाज प्रकरण क्र. ६३ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲण्ड पार्क (वाहनतळा) बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब पे ॲण्ड पार्कचे टेंडर काढतो म्हणून तुम्ही मागे सांगितले होते. आपण त्याला मागे मंजूरी दिली होती.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

नवीन जागा आणि आर्थिक व प्रशासकीय मंजूरीसाठी विषय ठेवला होता. मा. महासभेने पुन्हा सर्वेक्षण करण्यासाठी सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार पुन्हा सर्व्हेक्षण करुन येत्या मा. महासभेत पुन्हा विषय आणणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कधीपर्यंत?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आत्ता एका महिन्यामध्ये आपण विषय आणणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे तुम्हांला फक्त एक महिना पाहिजे?

**नयना म्हात्रे :-**

साहेब एकच महिना. नाहीतर तुम्ही एक एक महिना करता करता, सहा सहा महिने घालवता.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मॅडम तुम्ही मा. महासभेत मंजूरी द्या. मी लगेच करतो. मा. महासभेमध्ये विषय आला तेव्हा तुम्ही मंजूरी दिलेली नाही.

**नयना म्हात्रे :-**

असे बरेचसे विषय आहेत की तुम्ही एक एक, दोन दोन महिने करता करता ठेकेदारांना सहा महिने, आठ महिन्यांची तुम्ही मुदतवाढ देता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, मागे पण असा विषय झाला होता.

**मा. सभापती :-**

आत्ता याच्यामध्ये २५टक्के वाढ करुन द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

२०टक्के ठिक आहे.

**नयना म्हात्रे :-**

कारण त्या ठेकेदाराचे नाव भरपूर खराब आहे. तुम्ही निविदा कधी काढणार आहात ते जरा सांगा.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महासभेने मंजूरी दिल्यांनतर दुस-या दिवशी.......

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब जी जागा क्लिअर आहे. त्या जागेवर तुम्ही करा. जी जागा डिस्प्यूटेड आहे. आपली जी जागा मागच्या वर्षीची क्लिअर आहे. गेल्या पाच वर्षाचे टेंडर आपल्याकडे मंजूर होते. त्या जागा आत्ता क्लिअर आहेत. मा. महासभेने त्या जागांवर आक्षेप घेतलेला नाही. नवीन जागा ज्या आहेत. त्याच्यावर ऑब्जेक्शन घेतलेले आहे.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याच्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी लागते.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या मा. महासभेत तुम्हांला नवीन आयुक्तांनी आदेश दिले आहेत.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सर्व्हेक्षण करा म्हणून.

**मिलन म्हात्रे :-**

सर्व्हेक्षण बाजूला राहिले. तुम्हांला आदेश दिले आहेत. रेशनिंग ऑफिसला सांगितले आणि सुचना केली की, भाडे मिळावे. ब्रिजच्या खालची जागा आत्ता तिकडे बी.ओ.टी. वर पार्किंगचे दिले आहे ते तुम्हांला कॅन्सल करावे लागणार. प्लस आत्ता काही नवीन तुम्ही देणार आहात. आत्ता याच्यात तुम्ही निविदा काढून मंजूरी होईपर्यंत. तुम्ही लिहा, आम्ही तुम्हांला एक महिन्याची मुदत देतो. याच्यात लिहा. टिपणीत तुम्ही लिहिलेले नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ठरावात घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव कशाला. त्यांच्या टिपणीत आले पाहिजे. व्यवस्थित शुद्ध टिपणी द्या. तारीखवार टिपणी द्या.

**मा. सभापती :-**

एक महिना बोलून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, स्टॅण्डींगमध्ये ही चर्चा झाली. टंडन रिपोर्ट कधी आले ते जरा सांगा.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

टंडन रिपोर्ट फेब्रुवारी मध्ये आला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टंडन रिपोर्ट आल्यानंतर अधिका-यांची ड्यूटी आहे. प्रत्यक्ष जागी जाउन टंडनने एक वर्षापूर्वी सर्व्हे केलेला. आज त्या जागेची काय परिस्थिती आहे हे बघणे तुमचे काम आहे. आणि तुम्ही या पद्धतीने मोघम ठराव आणता मग त्या क्षेत्रिय अधिका-याला आमच्याकडून काय पाहिजे? हा तुमचा मोघम ठराव आहे. तुम्हांला क्लिअर सांगितले पाहिजे होते की तुम्ही मुदतवाढ द्या. तुम्ही कुठेही लिहिले नाही. श्री. पानपट्टे साहेब हा विषय तिस-यांदा आणलेला आहे. तुम्ही हा ठराव आणताना पुढे केला. मा. महासभेने तुम्हांला दोन चपात्या

खायला मंजूरी दिली आणि तुम्हांला तीन चपात्यांची भूक लागलेली आहे. तर तुम्ही दोन तशाच ठेवणार. तिसरी आल्यानंतर खाउ असे तुमचे म्हणणे आहे का? जे क्षेत्र वादित नाही, पाच वर्षापासून देत आले आहे. तुम्ही अशी टिप्पणी दिली पाहिजे होती की, हे क्षेत्र मागील पाच वर्षापासून आम्ही वसूल करत आलेलो आहे. हे क्षेत्र वादीत नाही. याला मंजूरी द्यावी आणि टेंडर काढायची मंजूरी द्या. पुढची पंधरा दिवसांची मुदतवाढ देउ. तुम्ही दिले पाहिजे होते. आम्हांला द्यायची काय गरज आहे.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यात तुमचे टेबल आले पाहिजे. पूर्वीची रक्कम एवढी, त्याच्यात एवढ्या साईटस् होत्या. त्या आत्ता आम्ही डिलीट केल्या. त्यामुळे अमुक अमुक डेफिशिएट झाले.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आत्ता आपल्या फक्त दोनच साईट आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

दोन आहेत किंवा दिड आहेत.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब मी माहिती सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही टेबल द्या. आम्ही ठराव केला. तुम्ही उद्या दुस-यालाच द्याल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही आरग्युमेंट करु नका. तुम्ही फक्त आम्ही जे सांगितले त्याच्यावर इंम्प्लिमेंटेशन करा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आमच्याकडून ठराव मागता मग विषय संपला. आत्ता तुम्ही जर टिप्पणी व्यवस्थित दिली असती तर हा विषयच आला नसता.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महासभेने मंजूरी दिली आणि समजा मा. महासभेने पुन्हा काही सुचना केल्या. त्याच्यासाठी आम्ही निविदा मंजूर करेपर्यंत आम्ही थांबलो. मा. महासभेने मंजूरी दिली तर या महिन्यात होउन जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या मागच्या विषयाचा जो जी. आर. आणला. तो जी.आर कोणासाठी दिला होता? कोणाकडे वर्ग केला होता? आपल्याकडे महिला आणि बालकल्याणमध्ये तो वर्ग झाला असेल. त्याच्यावर आपण श्रवणयंत्राचा ठराव केला. तो तुमच्याकडे कोणत्या डिपार्टमेंटतर्फे आला? मा. आयुक्तांकडे कोणत्या डिपार्टमेंटने टिप्पणी दिली? ते महिला बालकल्याणमध्ये येईल. त्या मा. आयुक्तांनी, त्या उपायुक्तांनी ते तुमचे पत्रक वाचावे. तुम्ही सेक्शन काढून वाचले नाहीत. जसाचा तसा तुम्ही दिला. आज तुम्हांला ते सांगावे लागले. हे तुमच्या टिप्पणीत आले पाहिजे. आणखीन तुमचे वाद कसले आहेत? उलट मिटींग लवकर संपेल. आत्ता याच्यात तुम्ही मुदत देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

देखो यह ठराव एकदम गलत है। आत्ता जे क्षेत्र पे ॲण्ड पार्कला अस्तित्वात आहे परंतु, वादीत नाही, त्याला तुम्ही पंधरा दिवसांची मुदतवाढ द्या. त्याची निविदा काढा. आणि आत्ता आपण होर्डींगचे कसे देतो? होर्डींगवर्षा मागे आपण वीस लाख रुपये मंजूरी दिलेली आहे. एक होर्डिंग पंधरा दिवसानंतर जाणार आहे. दुसरी मे मध्ये देणार आहे.

**मा. सभापती :-**

बरोबर है। अभी निविदा निकालने को दस दिन जाते है। और टेंडर आएगा तभी देख लेंगे।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहब जो पे ॲण्ड पार्क अभी अस्तित्व मे है। जिसपर वाद नही है। वसूल कर सकते है।

**मा. सभापती :-**

जो होगा नही होगा, सबका निविदा १५ तारीख को निकालनेकी बात की है।

**मिलन म्हात्रे :-**

साहेब या मा. महासभेत सगळे आटपून टाका आणि पहिल्या नवीन वर्षाचे द्या म्हणजे त्याचा शेवटचा पिरिएड मार्चच्या अगोदर होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जे बाधित नाही त्याची मा. स्थायी समितीमध्ये मंजूरी घेण्याचा अधिकार तुम्हांला आहे की नाही ते सांगा.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महासभेचीच मंजूरी घ्यावी लागते. आपल्याला पाच वर्षासाठी करावे लागणार आहे. त्यासाठी मा. महासभेचीच मंजूरी लागणार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही पहिला पॉईंट दिला आहे तो करु शकता की, नाही?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

टेंडर निकालने के लिए मा. महासभा का मंजूरी लगेगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जो वादीत नही है। वो क्षेत्र का ताबा लेने के लिए मा. महासभा मे विषय लेना पडेगा?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अपने को मंजूरी देने की जरूरत नही है। डायरेक्ट मा. महासभा मे वो विषय आ सकता है।

**प्रशांत पालांडे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्क च्या जागा उपलब्ध करण्याकरीता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण केलेल्या अहवालात दोष असल्यामुळे पुन्हा सर्वेक्षण करण्याकरीता मा. महासभेने सुचविले होते. पण यापूर्वी स्थायी समिती सभा दि. ७/२/२००८ ठराव क्र. ३६ ने पे ॲन्ड पार्कच्या ठेकेदार यांना दि. ३१/३/२००८ पर्यंत ठेका चालवण्यासाठी मंजुरी दिली असता पे ॲन्ड पार्क या संबंधित खात्याकडून मे. टंडन यांनी दिलेल्या अहवालावर प्रत्यक्ष जागेवर जाउन पाहणी न केल्याने अहवालात उत्पन्न झालेल्या दोषामुळे महापालिकेचे नुकसान झाले आहे. वादातीत जमिनी व्यतिरिक्त असलेल्या जमिनीवर (सध्या वादीत नसलेल्या जागांसाठी) फेरनिविदा काढण्यासाठी व सध्या चालू असलेले ठेकेदारास (मे. एस.एस. इंटरप्राईजेस व सुशिला ट्रेडींग कं.) मासिक रक्कम व मासिक रक्कमेवरती २० टक्के अधिक रक्कम घेउन तीस दिवसांची (एक महिना) मुदतवाढ देण्याकरीता ही मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यामध्ये सुचना करा. पंधरा दिवसांच्या आत प्रशासनाने निविदा काढून घेतली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही एका महिन्याची मुदत देताना पंधरा दिवस काय बोलता? तुम्ही एवढे बोलता. आम्ही सगळे ऐकतो. तुम्ही सुचना काय केली? त्यांनी कोष्टक निर्माण केले की, डिस्प्युटेड लॅण्ड एवढ्या आहेत. अनडिस्प्यूटेड एवढ्या आहेत. त्याच्यात काही उल्लेखच नाही. ते कोष्टक करा. त्याच्यामध्ये लिस्ट पाहिजे. बंधन टाकताना ते टाका. जे डिस्प्यूटेड असेल त्याचा विचार करण्यांत येउ नये आणि जे अनडिस्प्यूटेड असेल ते करू. ठरावाची कॉपी इकडे द्या. मी कुठे ते तुम्हांला सुचवतो. मग आत्ता पंधरा दिवसांची मुदत देता की महिन्याची देता?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

कलम ७९ नुसार महानगरपालिकेची मंजूरी लागते. महानगरपालिकेच्या मंजूरीशिवाय आपल्याला टेंडर काढत येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग हा विषय इकडे घेउच नका.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

फक्त मुदतवाढीसाठी विषय आणला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग आम्ही मुदतवाढ पण देउ शकत नाही. तुमचा विषय परत घ्या आम्हांला ठराव पास करायचा नाही. तुम्हांला हे पोरखेळ वाटले का? तुम्ही एकीकडे बोलता की, मा. महासभेची मंजूरी लागते आणि एकीकडे तुम्ही स्टॅण्डींगला विषय आणता.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

निविदा काढण्यासाठी मा. महासभेची मंजूरी लागते.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आत्ता ते आम्हांला सांगा.

**शरद पाटील :-**

ज्या बाधित जागा आहेत. त्यांची मंजूरी मा. महासभेला घेत जा. ज्या बाधित नाहीत. ज्या पहिल्यापासून चालत आल्या ते तुम्ही करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महासभेला तसा प्रस्ताव का पाठवत नाही? ही निविदा घ्या. बाकीची आम्ही नंतर करु.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तसेच सांगितले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब तुम्ही बसले काय तुम्ही खुलासा करा. आत्ता आमचे असे म्हणणे आहे की, त्यांनी डायरेक्ट निविदा काढायच्या आणि त्यांचे असे म्हणणे आहे की त्याला मा. महासभेची आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी लागेल. तर ती लागेल की नाही ते तुम्ही सांगा. नियम काय म्हणतो?

**नगरसचिव :-**

ज्या जागा क्लिअर आहेत त्यासाठी मंजूरी घ्यायची आवश्यकता नाही. ज्या पाच वर्षापूर्वीच्या क्लिअर जागा आहेत. माझे मत असे आहे की क्लिअर जागांना घ्यायची आवश्यकता नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे मा. महासभेची प्रशासकीय आणि आर्थिक मंजूरी घ्यायची गरज नाही.

**नगरसचिव :-**

ज्या अडचणीच्या जागा आहेत. त्या मा. महासभेत घेउन कराव्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

समजा, एखादे टेंडर आपण पाच वर्षासाठी दिले. ते टेंडर कम्प्लीट झाले म्हणजे ते टेंडर परत काढण्यासाठी मा. महासभेत प्रस्ताव येण्याची गरज नाही?

**नगरसचिव :-**

अडचणीच्या जागा सोडून.....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अडचणीच्या नाही. कुठल्याही क्लिअर जागा, साहेब तुम्ही प्रत्येक वर्षी निविदा काढता मग प्रत्येक वर्षी निविदा काढताना तुम्ही मा. महासभेची मंजूरी घे्ताच ना? जर कमी बजेट असेल तर स्टँण्डींगची मंजूरी घेता.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची थोडी गफलत होते. जसे तुम्ही ऑक्ट्रॉय दिले. हे धोरण महापालिकेचे एकदाच ठरले. त्याच्यात त्या नॉर्मस् आहेत की वीस परसेंट, दहा परसेंट जास्त घेउन तुम्ही त्याचा लिलाव करायचा. लिलाव मा. महासभेपुढे येणार. पण मिरा भाईंदर महानगरपालिकेत नव्याने ऑक्ट्रॉय सुरु करावा हा विषय येणार नाही. ते धोरण एकदाच ठरते. तुमचे धोरण एकदा ठरलेले आहे. जे काय बदल फेरबदल परिस्थितीनुसार होत जातील. ते तुम्ही मा. महासभा आणि मा. स्थायी समितीपुढे आणले पाहिजे.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब जागा भाड्याने द्यायच्या नाहीत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही मा. महासभेपुढे चुकीच्या पद्धतीने ठराव आणला. तुम्ही क्लिअर आणला पाहिजे होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब बघा. तुमची राईट साईड म्हणते की गरज नाही आणि लेफ्ट साईड म्हणते की गरज आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बी.ओ.टी वर साईड द्यायचे धोरण ठरले. आत्ता त्याच्यामध्ये तुमचे जे काही होईल, कमी जास्त, साईड चुकीच्या बरोबर. तुमचे लॉ ऑफीसर किंवा कोण बोलतील त्याच्यावर डिस्प्यूटेड साईडचा निर्णय होईल. आणि ज्या अनडिस्प्यूटेड आहेत. त्याच्यावर निर्णय घ्यायला काही हरकत नाही आत्ता वाद कुठे आहे. स्टॅण्डींगने घ्यायचा की मा. महासभेने घ्यायचा ते ठरवा.

**एस. ए. खान :-**

डिस्प्यूटेड साईड कुठल्या आहेत. ते नमुद करा.

**शरद पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब आत्ता तुमचा काय सर्व्हे झाला आहे.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दोन जागा वगळून बाकी सगळ्या करता येतील.

**शरद पाटील :-**

कुठच्या दोन जागा वगळून?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

एक आपले जांगिड कॉम्प्लेक्सच्या इथे आहे. त्याठिकाणी आपण करणार नाहीत आणि बालाजी नगर.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब क्लिअर म्हणणे आहे की, जे डिस्प्यूटेड नाही. त्यांना ताबडतोब........

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

या संदर्भात लेखापालांकडून आणतो.

**मा. सभापती :-**

श्री. बेलवटे साहेब खुलासा करा.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. पानपट्टे साहेब आपली मा. महासभा वीस तारखेला होते. मग तुमचे एक महिन्यामध्ये होईल काय?

**शरद बेलवटे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. हा विषय जो आहे. आत्ता मागील जे उत्पन्न पकडलेले आहे. त्याला आत्ता एक्स्टेन्शन द्यावे लागेल. परंतु वाढीव उत्पन्न विचारात घेउन द्यावे लागेल. त्यांनतर ते धोरणात्मक निर्णय म्हणून पाच वर्षासाठी द्यायचा की एक वर्षासाठी त्याचा संपूर्ण सर्व्हे झालेला आहे.

**मा. सभापती :-**

मुंबईमध्ये पे ॲण्ड पार्क दरवर्षी असते. आपल्याला दरवर्षीचे वेगवेगळे द्यायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता जे वादीत नाही. ते टेंडर निघेल का? जो क्लिअर है उसका बोलो।

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल जे म्हणतात. ते पण मा. महासभेतच आणावे लागेल का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही डिक्लेअर केले ना? पूर्ण सांगा. तुमचा धोरणात्मक निर्णय मा. महासभेला घ्यायचा ठरला. आपण पाच वर्षाच्या निविदा काढायच्या त्याच्यानंतर तुमचे किती आले. त्यानुसार तुमचे लेखापरिक्षणाचे अहवाल दहा टक्के जास्त असून त्या निविदा काढाव्या हा नियम आहे. ही निविदा आम्ही सही करुन काढत नाही. मा. आयुक्त काढतात. तुमचा जो लेखा परिक्षण विभाग आहे. आत्ता समजा पाच लाखाची निविदा गेली. तुम्ही साडे चारला त्याला मान्यता द्याल का नाही. म्हणजेच पाच लाख एकावन्न हजार किंवा एक हजार किंवा एक रुपया अशी पाहिजे. हा तुमचा भाग झाला. त्याच्याकरता आत्ता हे धोरण ठरले सगळे झाले. ही फक्त मुदतवाढ द्यायची आहे. साहेबांनी सांगितले की मा. महासभेत हा निर्णय होईल. आम्ही स्टॅण्डींगला निर्णय करायची की नाही करायचा एवढेच सांगा.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मंजूर केला पण कुठला ठराव ठेवला? ठराव वाचन कुठे झाला?

**मा. सभापती :-**

एक महिन्यासाठी वाढीव आपण वाचला. श्री. प्रशांत पालांडे साहेबांनी वाचला.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब माझ्या वॉर्डमध्ये बरेचसे ॲक्सीडेंट झाले. त्यावेळेला मी बांधकाम खात्याला माझे पत्र दिले. की पुलाच्या बाजूला टाकायला मला रॅबिट द्या. मला पंचवीस गाड्या पाहिजे होत्या. परंतु श्री. बारकुंड साहेबांनी मला फक्त दहा बारा गाड्या दिल्या असे का? मी ते रॅबिट माझ्या घरी घेउन जाणार आहे का?

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर केला.

**मिलन म्हात्रे :-**

काय मंजूर केला? ठराव वाचला?

**मा. सभापती :-**

एक महिन्याची मुदतवाढ दिली.

**मिलन म्हात्रे :-**

नुसती एक महिन्याची मुदतवाढ नाही. असे होत नाही.

**मा. सभापती :-**

त्याच्यात काय लिहिले ते श्री. प्रशांत पालांडे साहेबांनी वाचले.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी वाचले ते भलतेच आहे.

**मा. सभापती :-**

त्यांनी वाचले ते बरोबर आहे. मला एक महिना ऐकण्यात आले.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गाडोदिया यांचा ठराव वेगळा आहे आणि तुम्ही दिलेला ठराव वेगळा आहे.

**मा. सभापती :-**

तो ठराव वाचला गेला आहे. ठराव मंजूर केला. याच्यात श्री. पानपट्टे पैसे खाणार आहेत की, मी पैसे खाणार आहे?

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. आत्ता पैशांचा विषय आला आहे तर पूर्ण ऐकून घ्या.

**शरद पाटील :-**

आम्ही चुकीचा ठराव वाचून दाखवणार का? तुम्ही कसे बोलता?

**मिलन म्हात्रे :-**

ठराव वाचून तर घ्या. तुमच्या प्रशासनाने तुमच्या नसलेल्या जागा टेंडरने दिल्या आहेत, विकल्या आहेत. माझ्या दुकानाच्या समोरची सेट्रल गर्व्हमेंटची जागा तुम्ही विकली. त्याचे पैसे घेतले आणि त्याला रस्त्यावर आणले. तुम्ही काय सांगता? पन्नास साठ लाख म्हणजे मजाक वाटले काय? एखादा उद्या माझ्यासारखा ठेकेदार कोर्टात जाउन तुमच्याकडून पर्सनल वसूली करुन घेईल. दुसऱ्यांच्या जागा विकायला तुम्हांला अधिकार कोणी दिला? सेंट्रल गर्व्हमेंटची जागा, रेल्वेची जागा विकायला तुम्हांला कोणी अधिकार दिला? सौदे झाले आहेत तुम्ही जरा गावात फिरा मग कळेल. तुम्ही आज येता का? आमच्या समोरची सॉल्ट डिपार्टमेंटची साईट तुम्ही विकली. त्या व्यक्तीकडून पैसे घेतले. अडीच अडीच, पाच पाच लाख, तीन-तीन लाख रुपये तुम्ही घेता खायचे काम आहे काय? साहेब आमचे म्हणणे एकच आहे. ज्या अधिकृत साईट आहेत. त्यांना तुम्ही दरवाढ द्या आणि अनधिकृतची लिस्ट मा. महासभेत सादर करा. हेच त्याच्यात टाकतो. तुम्ही स्वतः किंवा तुमच्या माणसाने टेंडर वगैरे घेतले. उद्या दहा लाख रुपये घेतल्यानंतर दुसऱ्याची जागा गळ्यात बांधली तर तुम्हाला चालेल का? यांनी लोकांना रस्त्यावर आणले.

**मा. सभापती :-**

कोणी रस्त्यावर आणले ते मला माहिती नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माहिती करुन घ्या.

**मा. सभापती :-**

आपला विषय कुठला आहे, मुदतवाढ द्यायची. एका महिन्यात टेंडर निघाले नाही तर...

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही त्या डिस्प्युटेड जागा तुम्ही परत लिलावात काढाल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

याच्यामध्ये सध्या तुम्ही पे ॲण्ड पार्कच्या जागा चालवता त्याच जागांचा समावेश आहे. नवीन कुठल्याही जागा याच्यामध्ये ॲड करायच्या नाहीत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रशासन जेव्हा तीन निविदा आहेत. आपल्याला दोन क्लिअर आहे. त्यांनी मा. महासभेपुढे असा प्रस्ताव आणला असता की टंडनचा रिपोर्ट आहे. ही वादीत नाही. या चार वादीत आहेत. वादीतचा निर्णय तुम्ही नंतर घ्या. याला तुम्ही मान्यता द्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा एक डि.एम.सी. जाउन बघत नाही की, तुम्ही ज्या माणसाकडून तीन-तीन, चार-चार लाख घेतले त्याचा धंदा चालतो की नाही? पैसे मिळाले, पटापट जमा करुन मोकळे. साईडवर फिरायला कोणी तयार नाही. आपके मिरारोड के पे ॲण्ड पार्क का क्या हाल है? मेरे इधर सेंट्रल गर्व्हमेंटका जगह इन लोगो ने बेचा। बादमें वहा सॉल्ट लफडा हो गया। तीन साल तक उस कंम्पाउंड वॉल का फायनलायझेशन चल रहा था। वो साईट बेचने का अधिकार इनको किसने दिया? इन्होंने बेचा, पैसा भी लिया। बाद मे वो आदमी रस्ते पर आया। त्या सुलभ शौचालयाचे पण हेच झाले आहे. तुम्ही सगळीकडून पैसे घेतले. लोकांनी कर्ज काढले. सुलभ शौचालये चालू झाली आणि तुमच्याच लोकांनी जाउन तोडून आले. हे काय चालले आहे? लोक आम्हांला रस्त्यावर जवाब विचारतात. तुम्हांला विचारात नाही.

**एस. ए. खान :-**

आपल्या पालिकेच्या ज्या साईट आहेत त्याच्यामध्ये उभे करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ज्या अनडिस्प्यूटेड लॅण्ड आहेत. तिकडे तुम्ही करा. आमची काही हरकत नाही. डिस्प्यूटेड जे आहेत त्याचे नेमके डिस्प्यूट काय आहे?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्याकडे दोनच साईट चालू आहेत आणि डिस्प्यूटेड-अनडिस्प्यूटेडचा काही संबंध नाही. आपण फक्त सर्व्हेक्षण करुन ज्या काही पाच सहा नविन जागा आहेत. त्या आपण मा. महासभेत आर्थिक व प्रशासकीय मंजूरीला आणल्या होत्या. तुम्हांला प्रशासनाने दिलेले त्या सगळ्यासोबत या चार जागा दिलेल्या असे सहा जागांचे आपण एकत्र टेंडर काढणार होतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही ठराव मांडतो. तो ठरावामध्ये सुचना म्हणून घ्यायचा तर तसा घ्या पण याचा उल्लेख करा.

**प्रशांत पालांडे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्क च्या जागा उपलब्ध करण्याकरीता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण केलेल्या अहवालात दोष असल्यामुळे पुन्हा सर्वेक्षण करण्याकरीता मा. महासभेने

सुचविले होते. पण यापूर्वी स्थायी समिती सभा दि. ७/२/२००८ ठराव क्र. ३६ ने पे ॲन्ड पार्कच्या ठेकेदार यांना दि. ३१/३/२००८ पर्यंत ठेका चालवण्यासाठी मंजुरी दिली असता पे ॲन्ड पार्क या संबंधित खात्याकडून मे. टंडन यांनी दिलेल्या अहवालावर प्रत्यक्ष जागेवर जाउन पाहणी न केल्याने अहवालात उत्पन्न झालेल्या दोषामुळे महापालिकेचे नुकसान झाले आहे. वादातीत जमिनी व्यतिरिक्त असलेल्या जमिनीवर (सध्या वादीत नसलेल्या जागांसाठी) फेरनिविदा काढण्यासाठी व सध्या चालू असलेले ठेकेदारास (मे. एस.एस. इंटरप्राईजेस व सुशिला ट्रेडींग कं.) मासिक रक्कम व मासिक रक्कमेवरती २० टक्के अधिक रक्कम घेउन तीस दिवसांची (एक महिना) मुदतवाढ देण्याकरीता ही मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**मा. सभापती :-**

दुसरा ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ६३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲण्ड पार्क (वाहनतळ) बाबत.

**ठराव क्र. ५० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पे ॲन्ड पार्क च्या जागा उपलब्ध करण्याकरीता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण केलेल्या अहवालात दोष असल्यामुळे पुन्हा सर्वेक्षण करण्याकरीता मा. महासभेने सुचविले होते. पण यापूर्वी स्थायी समिती सभा दि. ७/२/२००८ ठराव क्र. ३६ ने पे ॲन्ड पार्कच्या ठेकेदार यांना दि. ३१/३/२००८ पर्यंत ठेका चालवण्यासाठी मंजुरी दिली असता पे ॲन्ड पार्क या संबंधित खात्याकडून मे. टंडन यांनी दिलेल्या अहवालावर प्रत्यक्ष जागेवर जाउन पाहणी न केल्याने अहवालात उत्पन्न झालेल्या दोषामुळे महापालिकेचे नुकसान झाले आहे. वादातीत जमिनी व्यतिरिक्त असलेल्या जमिनीवर (सध्या वादीत नसलेल्या जागांसाठी) फेरनिविदा काढण्यासाठी व सध्या चालू असलेले ठेकेदारास (मे. एस.एस. इंटरप्राईजेस व सुशिला ट्रेडींग कं.) मासिक रक्कम व मासिक रक्कमेवरती २० टक्के अधिक रक्कम घेउन तीस दिवसांची (एक महिना) मुदतवाढ देण्याकरीता ही मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल.** **अनुमोदक :- श्री. प्रशांत पालांडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६४, भाईंदर (पूर्व) जेसलपार्क सर्व्हे क्र. १५ या जागेत (जेसलपार्क चौपाटी) रस्त्यामधील चौकात आमदार निधितून गार्डन विकसित करण्याकरिता बांधकाम करणेबाबत.

**शरद पाटील :-**

या विषयात चौपाटीची जागा आपल्याकडे हस्तांतरीत झाली का? याचा प्रशासनाने पहिला खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

दि. १६/०५/२००७ च्या पत्रानुसार चौपाटीसाठी आरक्षित असलेली जागा, १५ हेक्टरपैकी १० हेक्टर जागेवर अतिक्रमण होउ नये म्हणून अटीशर्तीच्या अधीन जागा आपल्या ताब्यात दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अटीशर्ती काय आहेत?

**दिपक खांबित :-**

सदर जमिनीचा मालकी हक्क शासनाचा राहिल. शासनाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर परवानगीतील अटीशर्ती यांची पुर्तता झाल्यानंतर जमिन महानगरपालिकेच्या नावे करण्यांत येईल. सदर जमिनिवर अतिक्रमण होउ नये म्हणून जमिनीचा आगाउ ताबा देण्यात येत आहे. त्यामुळे सदर जागेवर महानगरपालिकेचा हक्क राहणार नाही. जागेवर असलेली मॅग्रोजची झाडे तोडता येणार नाहीत. जागेची मोजणी करुन घेणे हे महानगरपालिकेस बंधनकारक राहील. सदर जागेवर कोणताही कार्यक्रम, सभा इत्यादी कार्यक्रम मा. जिल्हाधिकारी सो. यांच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाहीत. या सहा अटीशर्ती आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याची दुसरी अट जरा वाचा.

**दिपक खांबित :-**

शासनाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर परवानगीतील अटीशर्ती यांची पूर्तता झाल्यानंतर जमिन महानगरपालिकेच्या नावे करण्यांत येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज जो ठराव आणलेला आहे जी टिपणी आणलेली आहे. याच्यामध्ये प्रशासनाची भुमिका सांगावी. तुम्ही दोन नंबरची अटीशर्ती वाचली. तुम्ही आमदारफंड किंवा कोणाचाही फंड खर्च करणार आहात. दोन नंबरच्या अटीशर्तीचा काय उल्लेख होतो?

**दिपक खांबित :-**

आपल्याला शासनाकडे पाठवावे लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमच्याकडे काही गोष्टी नसताना सी.आर.झेड मँग्रोज हे त्या ठिकाणी असताना तुम्ही स्वतः लिहिता आणि जोपर्यंत शासन तुम्हांला कुठलाही निर्णय देत नाही. तुम्हांला कलेक्टर परवानगी कसा देणार? कलेक्टर मोठा की शासन मोठे? म्हणजे तुम्ही हा प्रस्ताव कलेक्टरकडे पाठविण्यासाठी मंजूरी मागता. शासन तुम्हांला मान्यता देत नाही. जोपर्यंत शासनाची मान्यता नाही. तुम्ही कलेक्टरला कशासाठी पाठवणार?

**दिपक खांबित :-**

आपण शासनाकडे प्रस्ताव पाठवलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो येउ द्या. काय घाई आहे? म्हणजे कुठल्यातरी आमदाराचा फंड लावायचा आहे. कुठल्यातरी नगरसेवकाचा फंड लावायचा आहे. हा प्रस्ताव तुम्ही आणला कसा? त्या गोष्टी तुम्हांला व्हिजीबल नाहीत. त्या गोष्टी तुम्हांला शासनाकडून क्लिअर करुन घ्यायच्या आहेत. कलेक्टर आमदारांचा फंड केव्हा रिलीज करतो, जेव्हा तो दिलेला प्रोजेक्ट क्लिअर असेल. शासनाकडून, महापालिकेकडून, कुठलाही वादीत नसेल आज ते क्षेत्र वादीत आहे. तुम्ही शासनाकडून मंजूरी मागितलेली आहे. म्हणजे प्रत्येक वेळी बोर्ड लावायचे की, आमदार फंडातून होणार आहे. काय होणार? तुमच्याकडे परवानगीच नाही.

**शानू गोहिल :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गाडोदियाजी आपकी जानकारी के लिए मै बता दू की अब तक वहा पर एक करोड रुपया खर्च हूआ है। तब आप चूप बैठे थे क्या? आपके स्थानिक नगरसेवक चूप बैठे थे क्या? आप अभी बताईए। एक अच्छा काम हो रहा है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आप उनको बोलिए।

**शानू गोहिल :-**

मै आपको बोल रही हू। क्योंकी आपही इसके अंदर बाधा डाल रहे है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रशासन को पुछीए।

**शानू गोहिल :-**

प्रशासन से क्या पुछना? प्रशासन ने उधर खर्च किया है। वहा पर गुलाब गार्डन बन सकता है। वहा पर खेल का मैदान बन सकता है। तो वहा पर जॉगर्स पार्क क्यो नही बन सकता है?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब एवढ्या अटीशर्ती असताना नगरपालिकेने करोडो रुपये खर्च केला. मग तो कसा काय खर्च केला?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब प्रशासनाने याच्यामध्ये क्लिअर कट दिलेले आहे. याच्यामध्ये सी.आर.झेड. आहे, मॅनग्रोज आहेत. आपण जोपर्यंत शासनाची परवानगी घेत नाही तोपर्यंत आपण काहीच करु शकत नाही, असा नियम आहे. कारण ऑलरेडी आपल्या पालिकेतर्फे दोन चार प्रकरणे सी.आर.झेड. डिपार्टमेंटला पाठवली होती. त्यावेळेला श्री. घेवारे साहेब, मा. महापौर साहेब आणि मी, आम्ही स्वतः तिथे गेलो होतो. तेव्हा त्यांनी स्पष्ट सांगितले की मिरा भाईंदर महानगरपालिकेने परत एकत्रित प्रस्ताव शासनाकडे पाठवावा आणि त्यांची कार्यवाही सुरु आहे. आपला पाठवलेला प्रस्ताव रिजेक्ट झालेला आहे. त्यांनी रिजेक्ट केलेला आहे. श्री. गोयल साहेब जे त्या डिपार्टमेंटचे सचिव आहेत. यांनी सांगितले की मिरा भाईंदरमध्ये जो सी.आर.झेड. लागलेला आहे तो चुकीचा लागलेला आहे आणि त्याच्यामुळे महापालिकेने एकत्रित प्रस्ताव पाठवावा की जेणेकरुन तो सी.आर.झेड चा प्रस्ताव परत रिशफल होईल आणि नवीन प्लॅन येईल. त्याच्यामुळे हा सी.आर.झेड जाणार नाही. आणि त्याच्यामुळे हा खर्च करणे संयुक्तिक वाटत नाही. प्रपोजल चांगले आहे. परंतु काही अडचणी असल्यामुळे सध्या तरी आपण हा ठराव करु नये अशी माझी आपणांस विनंती आहे.

**मा. सभापती :-**

मला एक सांगायचे आहे की, आपल्या महानगरपालिकेचे पैसे जात नाहीत. येणाऱ्या आमदारांचा फंडातून येणार आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, मला याच्यावर बोलायचे आहे. श्री. मोहन पाटील सभापती असताना, श्री. राम नाईक यांनी एक करोड रुपये निधी त्या चौपाटीला देतो म्हणून डिक्लेअर केले. त्यावेळेला श्री. मोहन पाटील यांनी त्याला विरोध केला. त्यावेळेला त्यांना काम करु दिले नाही. आणि आत्ता आपण सांगता काम होणार हे चांगले आहे, ठिक आहे. आपला पैसा जाणार नाही, हरकत नाही. पैसा जाणार नाही आणि काम होईल हे चांगले आहे. त्याच्याबद्दल आम्हाला विरोध केला. श्री. खांबित साहेब तिथे जे सुलभ शौचालय बांधले आहे. त्याला पालिकेचे पैसे होते?

**दिपक खांबित :-**

त्या विषयावर मी मा. आयुक्तांशी चर्चा केली. मा. आयुक्त साहेब येतो असे बोलले. पण त्यांच्याकडे पत्रकार बसले आहेत.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब त्या कामामध्ये सुद्धा पालिकेचे पैसे जात नाहीत. मग ते काम आपण का बंद केले?

**मा. सभापती :-**

ते कोणाचे पैसे आहेत?

**शरद पाटील :-**

ते ट्रस्टचे पैसे आहेत. ते ट्रस्टने केले आहे. त्यांना यांनी नियमानुसार परवानगी दिली. सगळे झाल्यानंतर ते काम बंद केले.

**मा. सभापती :-**

ते कोणाचे पै्से आहेत?

**शरद पाटील :-**

ते ट्रस्टचे पैसे आहेत. हे ट्रस्टने केले आहे. त्यांना यांनी नियमानुसार परवानगी दिली. सगळे झाल्यानंतर ते काम बंद झालेले आहे. पैसे येतील, कोणाची कामे होतील आम्हांला त्याच्याबद्दल विरोध नाही. प्रशासनाने त्यांची भूमिका स्पष्ट करावी. खर्च करायला आमचे कुठे काय जाणार आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

चौपाटीचा ठराव आपण केल्यानंतर आपले मा. आमदार सक्षम आहेत, की सी.आर.झेड. काढायचे असेल, तरीसुद्धा ते सक्षम आहेत आणि ते काढणार आहेत. पण आपण ठराव केल्यानंतर ते त्याची प्रोसिजर करणार आहेत. त्याच्यानंतर ते खर्च करणार आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पहिल्यांदा त्यांना शासनाची मंजूरी आणू द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. तूळशीदास म्हात्रे साहेब फेरवर्गीकरणाचा प्रस्ताव आपल्या महानगरपालिकेने दिला पाहिजे. त्याची प्रोसेस अजून सुरु आहे, त्याची कार्यवाही पण सुरु आहे. तो प्रस्ताव अजून तिथे पाठवलेलाच नाही.

**शानू गोहिल :-**

कार्यवाही हो रही है। तो वहा पर प्याउ बन गये। वहा पर पुलिस चौकी बन गयी। यह सब कैसे बन गया? तभी सी.आर.झेड नही था क्या?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आप प्रशासन को पुछिए।

**शानू गोहिल :-**

यह तो सिर्फ नॉर्मस् लगा रहे है। इसमे ना मॅनग्रोज को नष्ट कर रहे है। आर.सी.सी. कन्स्ट्रक्शन होगा तो सी.आर.झेड लगता है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जब तक अपने को परमिशन नही मिलती, तब तक उसके अंदर कुछ नही कर सकते।

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, मिरा भाईंदरला सी.आर.झेड. मध्ये किती टॉवरचे काम चालू आहे.

**तूळशीदास म्हात्रे :-**

तो सी.आर.झेड हटविण्यासाठी महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख, मी आणि श्री. घेवारे साहेब पण त्या ठिकाणी होते. मा. आमदार आणि आम्ही या कामासाठी गेलो होतो. पण त्या दिवशी काही कारणास्तव ती मिटींग लांबणीवर गेली. ती मिटींग आत्ता परत होणार आहे. तेव्हा ते काम होणार आहे आणि म्हणून आपण इथे ठराव करणे जरुरी आहे.

**एस. ए. खान :-**

ठराव केल्यानंतर त्याची प्रोसिजर चालू होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा फक्त मा. आमदार निधीतून गार्डन डेव्हलप करण्याचा ठराव आहे.

**शानू गोहिल :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It Baa[-Mdr ³pUva-´ jaOsalapak- savho- Ë.15 hI jaagaa caaOpaTIkrIta Aarixat Aaho. sadr izkaNaI EaIgaNaoSa ivasaja-na krIta mahanagarpailakomaaf-t ivasaja-na GaaT baaMQaUna rsto tyaar krNyaat Aalaolao Aahot. sadr rs%yaacyaa maQyao caaOk AsaUna sadr izkaNaI maaozyaa p`maaNaavar naagarIk yaot Asatat. sadr caaOkat gaaD-na ivakisat krNyaakrIta maa.EaI mauJaFfr husaona¸ ivaQaana prIYad sadsya yaaMnaI inaQaI ]plabQa k$na doNyaabaabat kLivalaolao Aaho. sadr caaOkalagat va rs%yaakDolaa kuMpNaiBaMt baaMQalyaasa %yaamaQaIla Baagaat maatIBarava k$na gaaD-na ivakisat krta yao[-la. sadr jaagaa hI CRZ -I (i) CRZ-I (ii) tsaoca BaagaSa: Mangrove Buffer Zone nao baaiQat haot Aaho. tsaoca rajya SaasanaakDo forvagaI-krNaabaabat p`stava sauQda pazivaNyaat Aalyaabaabat nagarrcanaa ivaBaagaanao kLivalaolao Aaho. sadr gaaD-na ivakisat krNyaakrIta $.13¸18¸750À¹ evaZa Kca- yaoNaar Aaho. trI varIla AMdajap~kasa maa.ijalhaiQakarI yaaMcyaakDo sqaainak ivakasa kaya-ËmaaMtga-t inaQaI ]plabQa k$na doNyaakrIta p`stava pazivaNyaasa maanyata doNyaat yaot Aaho.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. सभापती साहेब जो गोषवारा आहे त्याच्यामध्ये प्रशासनाने स्पष्ट म्हटलेले आहे.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पुर्व) जेसलपार्क सर्व्हे क्र. १५ ही जागा चौपाटीकरिता आरक्षित आहे. सदर ठिकाणी श्रीगणेश विसर्जना करिता महानगरपालिकेतर्फे विसर्जन घाट बांधून रस्ते तयार करण्यात आलेले आहेत. सदर रस्त्याच्या मध्ये चौक असुन सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरिक येत असतात. सदर चौकालगत व रस्त्याच्या कडेला कुंपणभिंत बांधल्यास त्यामधील भागात मातीभराव करून गार्डन विकसित करता येईल. सदर जागा ही CRZ -I (i) CRZ-II (ii) tsaoca BaagaSa: Mangrove Buffer Zone ने बाधीत आहे. तसेच राज्य शासनाकडे फेरवर्गीकरणाबाबत प्रस्ताव सुद्धा पाठविणेत आल्याबाबत नगररचना विभागाने कळविलेले आहे.

असे असले तरी प्रत्यक्ष राज्य शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाबाबत शासनाकडून कोणताही आदेश आलेला नाही. तसेच मा. आमदार / व खासदार / अन्य यांचा एकूण किती फंड सदर कामासाठी उपलब्ध होणार आहे व एकूण किती खर्च कोणकोणत्या कामासाठी उपलब्ध होणार आहे. याचा पुर्ण गोषवारा सदोष असल्याने व प्रशासनाची भुमिका स्पष्ट नसल्याने सदर प्रस्ताव शासनाकडून आल्यावर पुढील कार्यवाही साठी मान्यता पुन्हा पुढील सभेत आणावी. असा मी ठराव मांडत आहे.

**प्रशांत पालांडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता कार्यकारी अभियंता यांनी जे ठराव आणलेला आहे. कोणाचे नाव होईल, कोणाचे होणार नाही या वादात मी जात नाही. एक सदस्य या नात्याने आम्ही नगरसेवकांनी काय केले पाहिजे आणि जे मला कळते ते मी सांगतो. मागच्या वेळेला अशीच आमची मिटींग होती. त्यावेळेला सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील आपण कलेक्टर ऑफीसला होते आपले श्री. आर. डी. शिंदे साहेब आणि श्री. बारकुंड साहेब होते. त्यावेळेला जिल्हाधिकारी श्री. जंत्रे साहेब यांच्या पाठीमागे या जेसलपार्क चौपाटीकरिता आणि वेस्टच्या चौपाटीकरिता श्री. मोहन पाटील यांनी आग्रह धरला. तर त्यांनी स्पष्ट सांगितले की सी.आर.झेड आणखीन ही सर्व बाब राज्य शासनाच्या अखत्यारीत नाही. तुमचे सरकार दिल्लीला आहे तुम्ही दिल्लीवरून मिनिस्टरीमधून ही परवानगी घेउन या. मग मी तुम्हांला या दोन्ही जागा तात्काळ देउन टाकतो. सेंट्रल वरून परवानगी घेउन या. आता सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब बोलले की, आम्ही स्टेट गर्व्हमेंटकडून परवानगी घेउन येऊ परंतु, स्टेट गर्व्हमेंटच्या अखत्यारीतला तो विषय नाही. सी.आर.झेडचा कायदा हा सेंट्रल गर्व्हमेंटचा आहे. जसे फॉरेस्ट सेंट्रल गर्व्हमेंटचे आहे तसे. आज तुमची जी टिपणी इकडे येते ही टिपणी हे सगळे असूनसुद्धा आमच्याकडून हे कशासाठी करून घेता हे मला कळत नाही. मागच्या वेळेला तुमच्या डि.एम.सी. वर दोन केस व्हायच्या होत्या. मला फोन आला होता. तुम्हांला पेणकरपाड्यामध्ये जेलमध्ये घातले असते. आमचे एस.आय. गेले. जामीन

करुन आले. या ठरावावर मतदान करुन किंवा न करुन आम्ही कशाला लिटीगेशनमध्ये पडायचे. म्हणजे तुम्ही आम्हांला तुमच्या टिपणीद्वारे कळवता की इथे सी.आर.झेड. आहे. अमुक अमुक आहे. बफर झोन आहे. मॅनग्रोज आहे. आणि हा विषय तुम्ही आणला. जी सेंट्रल गर्व्हमेंटच्या अखत्यारीतील बाब आहे. ज्या गोष्टीला मंजूरी नाही. सब्जेक्ट टू कंडीशन. हा विषय तुम्ही आमच्याकडे कसा आणला? आत्ता नगररचना विभागाचे पत्र आहे का? उद्या श्री. घेवारे हात वर करतील. नगररचना विभागाच्या पत्राचा नंबर नाही, काही नाही. तुम्ही तरी कुठल्या आधारावर मतदान करणार? नगररचनाने पत्र दिले आहे का? उद्या ते श्री. घेवारे हात वर करतील. त्या मनुभाईच्या वेळेला ते सभागृहामध्ये धडधडीत खोटे बोलले. त्या आर्कीटेक्टने ॲग्रीमेन्ट बनवले. श्री. प्रधान साहेब, बोलले मला लेखी पत्र द्या. मी तुम्हाला लेखी कळवतो. माझा धंदा आर्कीटेक्टचा आहे. ॲग्रीमेन्ट बनवायला मी वकील नाही. पण तो अधिकारी सभागृहामध्ये खोटे बोलला. उद्या ते बोलले की, मी असे सांगितलेच नाही, तर? प्रशासनाने नगररचना विभागाचे क्लिअरकट पत्र असल्याशिवाय हा ठराव घेउ नका. तहकुब करा. तुम्ही दोघेही तो ठराव ठेउ नका. आज श्री. घेवारे साहेब इथे असतील तर त्यांनी खुलासा करावा की, त्यांचे पत्र कुठले आहे? श्री. घेवारे साहेब, तुमचे काय म्हणणे आहे? हा जो विषय आलेला आहे. माझ्या वॉर्डामध्ये जमिन आहे. त्याच्यात कंपाउंड वगैरे तयार आहे. एक थोडासा गेट काढून तुम्हाला महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरिता मार्केट बनवा. व्हेजीटेबल मार्केट, काही बांधकाम करायचे नाही. सी.आर.झेड. कायदा पास झाल्यानंतर तिकडे आपण चार टॉवरला परवानगी दिली. टॉवर उभे राहिले. त्याची सगळी सर्टीफिकेट मिळाली. पाणी कनेक्शन सगळे झाले. पण महापालिकेचे व्हेजीटेबल मार्केट अजून बनत नाही. कारण, आपण फक्त सी.आर.झेड.चे कारण सांगितले. अशा बेसवर या ठरावाला आम्ही मंजुरी द्यायची का? साहेब, तुम्ही याच्यावर टिप्पणी सादर केली. तुमच्या पत्राचा हवाला दिला आहे.

**दिलीप घेवारे :-**

आम्ही बांधकाम विभागाला तसे कळवले आहे. फेरवर्गीकरणाचा प्रस्ताव शासनाला पाठवलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुमची काय प्रोसिजर आहे, त्याच्याशी आम्हाला काय घेणं-देणं नाही. मी म्हणतो की, सी.आर.झेड.चे मालक केंद्र सरकार आहे, जे आम्हाला श्री. जंत्रे साहेबांनी चारचौघांमध्ये सांगितले. हे विटनेस आहेत. त्यांनी सरळ सांगितले की, वर तुमचे सरकार आहे. तुम्ही परवानगी घेउन या. मी दोन मिनिटात परवानगी देतो. श्री. मोहन पाटील यांनी बजेट पण सांगितले की, आम्ही साडेतीन करोड रिझर्व्ह ठेवले आहेत. तीन ते चार वेळा झाले. शेवटी श्री. जंत्रे साहेब हसले आणि त्यांनी श्री. आर. डी. शिंदे यांना सांगितले की, हे सभापती आहेत. यांना सी.आर.झेड.चा कायदा काय असतो तो समजावून सांगा. म्हणजे ही परिस्थिती आहे. मला एक सांगा, त्यांनी तुमचा रेफरन्स दिला. तुमच्या नगररचना विभागातर्फे ही गोष्ट करावी की करु नये?

**दिलीप घेवारे :-**

शासनाची पहिली परवानगी घ्यावी लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

ते तर घ्या. ते तर अगदी आंधळापण समजतो. पण आत्ता हा प्रस्ताव आला. उद्या आम्ही याला आम्ही यस केले. ठराव बहुमताने पास झाला. उद्या त्या म्हणतील की, याला परमिशन द्या. हा प्रस्ताव सदनामध्ये आला पाहिजे की नाही? इथून आपण सुरुवात करु या. साहेब, टेक्नीकल ग्राउन्ड असेल. तुम्ही वेग मोडून चालत नाही. तुम्ही अधिकारी आहात. मी जर एखादा चुकीचा प्लान तुमच्याकडे टाकला.

**दिलीप घेवारे :-**

मा. आयुक्तांनी आणलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तांचे नाही. मा. आयुक्तांच्या मंजुरीने आले पण तुम्ही कळवायला पाहिजे.

**दिलीप घेवारे :-**

मा. आयुक्त साहेबांनी आणलेले आहे. त्याच्यावर मी भाषण करु शकत नाही. बदल करायचे अधिकार आपले आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

प्रशासनाच्या वतीने मी यामध्ये वस्तुस्थिती सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. सन्मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन, विधान परिषद सदस्य यांनी या कामासाठी निधी देण्याचे पत्र दिलेले आहे. त्या अनुषंगाने हा प्रस्ताव मा. आयुक्तांकडे सादर केल्यानंतर त्यामध्ये आपण जे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्या सगळ्या बाबींचा इथे गोषवाऱ्यामध्ये उल्लेख केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मा. आमदारांना किती तारखेला पत्र दिले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आम्ही मा. आमदारांना दिले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हीच तर म्हणालात की, आम्ही त्यांना कळवले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मा. आमदारांनी आपल्याला पत्र दिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आमदारांनी तुम्हाला कळवले. तुमचे काम आहे. तुम्ही हे चुकीचे गोषवारे पुन्हा पुन्हा आणता आणि इच्छा नसताना आमचे वाद होतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

वाद होण्याचा प्रश्नच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे त्या सी.आर.झेड.ला परमिशन नसताना आम्ही मंजुरी द्यायची असे तुमचे म्हणणे आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

हा प्रस्ताव कुठे जातो. आपण आज काम करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न कामाचा नाही. ज्या दिवशी एखाद्या विषयावर मतदान होउन ठराव पास होतो. तेव्हा तो निर्णय आम्ही घेतलेला असतो. आम्हाला तुम्हाला ठार मारायचे आहे काय? तुम्हाला पास करायचा आहे तर करा. मी माझ्या परिने तटस्थ राहणार. तुम्ही वाटेल तसे ठराव आणता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तुम्ही काय राहणार हे तुमचे अधिकार आहेत. तुमच्या अधिकारासाठी कोणी दुसरा काही करु शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या मालकीची जागा नसेल तर मा. आयुक्तांनी निर्णय कसा घेतला? आम्ही तर इकडून बोलतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

हा प्रस्ताव मा. जिल्हाधिका-यांकडे पाठविण्याचा प्रस्ताव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. जिल्हाधिकारी बोलतात की, सेंट्रल गव्हर्नमेन्टकडे मंजुरीला जा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मा. जिल्हाधिकारी साहेब याच्यामध्ये निर्णय घेतील. द्यायचा किंवा नाही द्यायचा? करता येते किंवा नाही करता येते? त्या ठिकाणी ते फायनल होईल.

**मिलन म्हात्रे :-**

उद्या एखाद्याने क्लेम केला की, या बफर झोनमध्ये हे काम करायला यांनी ठराव करुन अनुमती दिली. साहेब त्याच्यामध्ये १०० टक्के आम्ही जिम्मेदार असतो. तुमचे बरे आहे, तुम्ही आमच्यावर ढकलुन मोकळे व्हाल. बॉडीने मंजुरी दिली आहे. बॉडी इज रिस्पॉन्सीबल. मागच्या वेळेला एस.आय. जेलमध्ये गेले. जेव्हा जामीन द्यायला कोणीही तयार नव्हते. दोन डी.एम.सी.ची हालत खराब झाली होती. ज्यावेळेला जेलमध्ये बसायची पाळी येते त्यावेळेची मी गोष्ट करतो. प्रश्न मॅनग्रोज तुटतील वगैरे तो भाग नाही. बी टेक्नीकल. मा. आयुक्तांनीच या ठरावावर सरळ कळवायला पाहिजे की, याची परवानगी अजून आलेली नाही. आपला निधी आणखीन कुठल्या तरी चांगल्या ठिकाणी वर्ग करा. परवानगी आल्यानंतर आपल्याकडून आम्ही डबल निधी वसुल करु.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

यामध्ये मोठे विकास काम नाही. आपण गणपतीला जी जागा वापरतो. ती मा. जिल्हाधिकारी महोदयांकडून आपल्याकडे आलेली आहे. याचे कोणतेही मोठे विकास काम न करता गार्डन टाईप लॉन तयार करुन त्या ठिकाणी सुशोभिकरण करण्याचा हा प्रस्ताव आहे. ओपन रूल्स काय आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

मी याला विरोध करत नाही. याच्यापुढे जाउन सांगतो. तुमची चौपटी आहे. तिकडे मोठे मोठे धंदे खोलून बसले आहेत. प्रत्येक बाबा येतो. स्वतःकडून २५-२५, ५०-५० लाखाची वसुली होते. तुमचे भाडे किती जाते? फक्त पाच हजार भाडे जाते. तुमच्या शिवाजी पार्कमध्ये चर्नीरोडच्या चौपाटीला, ऐकून घ्या विषय ज्यावेळेला येतो. सांगोपांग विचार करायला हवा, चर्नीरोडच्या चौपाटीला सुध्दा हायकोर्टाच्या निर्देशाने तिकडे कोणालाही स्ट्रक्चर किंवा सभेला परवानगी नाही. हे मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. तुमच्याकडे चौपाटीला तुम्ही डेप्युटेशन लावता. कामे चौपाटी म्हणून करता आणि तिकडे दोन-दोन महिने पंडाल लागलेले असतात. ही कथा, राम कथा, रावण कथा, शुर्पनखा कथा चालु. तो धंदा होतो. आणि तुम्ही पाचशे-दोनशे रु. नॉमिनल भाडे घेता. तिकडच्या राहणा-या नागरीकांना केवढा त्रास आहे ते तुम्ही बघितले का? रात्रंदिवस, बारा-बारा, एक-एक वाजेपर्यंत तिकडे ऑर्केस्ट्रा चालू असतात. कोणाचे लक्ष आहे का?

**मा. सभापती :-**

आत्ता कुठे परवानगी आहे?

**मिलन म्हात्रे :-**

सगळ्या परवानग्या आहेत. अजुन कार्यक्रम चालु आहेत. तुम्ही जरा फिरा.

**शानु गोहिल :-**

कार्यक्रम दोन-दोन, तीन-तीन वाजेपर्यंत चालु असतात.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती तुम्ही आमच्या बरोबर पायी फिरा. मग तुम्हाला कळेल की, भाईंदरमध्ये काय चालले आहे. त्या चौपाटीवर कोणालाही परवानगी द्यायला तुम्हाला अधिकार नाहीत. तुमच्याकडे चौपाटी आहे ना मग त्याठिकाणी त्या हिशोबाने पाळले पाहिजे. लोक तिकडे जॉगींगला जातात, काही शांत बसण्याकरीता जातात. तिकडे रात्रंदिवस आत्ता कमर्शिअल झाले आहे. मी कुठल्या धर्माचे बोलत नाही. त्या लोकांना शांतता हवी की नको? आमच्या इकडे वेस्टला रेल्वेवाले सरळ मारुन बाहेर काढतात. तुमची चौपाटी ज्या डेफीनेशन करीता आहे तीच राहिली पाहिजे. अधिकाऱ्यांनी जाउन सर्व्हे केला का? किती लोकांनी तिकडे हडप केले आहे? कोणी कंपाउन्ड वॉल ठोकली आहे? जागा तुमची, कंपाउन्ड वॉल कोण तिसरा ठोकतो आहे. लावतात भलतेच काहीतरी मा. सभापती साहेब, हा विषय तुम्ही १५-२० दिवसांनी किंवा एक महिन्याने आणा. प्रशासनाकडून व्यवस्थित घ्या. कोणाची अतिक्रमणे झाली आहेत? कुठली आहेत? किती बाधीत झाली आहेत? किती ओपन आहेत? सगळे व्यवस्थित डिटेल आणा. आम्ही विरोध करत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

साहेब, याच्यात कशी भुमिका होती हे मी तुम्हाला सांगतो की, त्या ठिकाणी सी.आर.झेड.-१, सी.आर.झेड-२ ह्या सर्व बाबी याच्यात दिलेल्या आहेत. आणि त्याचा फेरवर्गीकरणाचा प्रस्ताव आपण ऑलरेडी नगररचना विभागाकडून शासनाकडे सादर केलेला आहे आपल्याकडे मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय तिथे काही करता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणून बोलतो. हा ठराव पण आम्ही पास करु शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही बोलतात की, मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची गरज नाही. इथे महाराष्ट्र शासनाची आणि केंद्र शासनाच्या परवानगीची गरज आहे. मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची गरज नाही.

**मिलन म्हात्रे :-**

काही संबंध नाही. मा. जिल्हाधिकारी बोलतात की, आय एम होपलेस.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. जिल्हाधिकाऱ्याकडून आमदार फंड सॅन्क्शन करायचा की नाही याची परवानगी लागते.

**मिलन म्हात्रे :-**

तेसुध्दा त्यांना बंधन आहे. रेल्वेच्या जागेत आमदार फंड देउ शकत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, आपल्याकडे दोन ठराव आलेले आहेत. जर प्रशासन आपली भुमिका स्पष्ट करत नाही......

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, इथे वाद घालण्यात मतलब नाही. प्रशासनाने सदरचा ठराव चुकीचा आणलेला आहे. याच्यासाठी आपल्याला अगोदर महाराष्ट्र शासनाची परवानगी घ्यावी लागेल आणि महाराष्ट्र शासनाने परवानगी दिली तर कलेक्टरकडे जाईल. प्रशासनाने हा चुकीचा ठराव आणलेला आहे. कारण ह्या डिपार्टमेन्टला माझा दोन-तीन प्रस्तावांचा पाठपुरावा चालु आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे कमीत कम सात ते आठ प्रस्ताव तिथे गेलेले आहेत आणि तिथून ते प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर आपल्याला सदरचा प्रस्ताव.......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सर्वांचे एकमत होत असेल तर....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही चुकीचे सांगता.

**शरद पाटील :-**

तुम्ही असे कसे कराल? उद्या काय झाले तर त्याला आम्ही जबाबदार राहणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आमदारांनी खुप चांगला प्रस्ताव आणलेला आहे. परंतू, प्रशासनाने त्याला गोल गोल केलेले आहे आणि आमच्यात भांडणे लावलेली आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

भांडणे लावण्याचा विषय नाही. कृपया, विषयांतर करु नका. याच्यामध्ये आपण आज निर्णय केला म्हणून उद्या काम सुरु करतो अशी परिस्थिती नाही, हे मला सभागृहाला सांगायचे होते.

**शरद पाटील :-**

साहेब, याचे अवलोकन करा. अवलोकन करुन करा. आमच्याकडे कशाला आणता?

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तांना सभागृहामध्ये कॉल करा. मा. आयुक्तांना अशी मंजुरी द्यायच्या पॉवर्स आहेत का? ज्याला सी.आर.झेड.ची परवानगी नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. घेवारे साहेबांनी सभागृहाला सांगितलेले आहे. आम्ही सर्व मा. आयुक्तांच्या अधिपत्याखाली काम करतो. मा. आयुक्तांनी एखादा निर्णय घेतल्यानंतर आम्ही त्याला खोटे कसे बोलणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कोणत्या आयुक्तांनी निर्णय घेतला?

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तांनी दिलेली टिपणी कुठे लावलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कोणत्या आयुक्तांनी डिसीजन घेतला. आयुक्तांना विचारा.

**मिलन म्हात्रे :-**

कुठले आयुक्त आहेत? श्री. सुदामराव गायकवाड आहेत, श्री. आर.डी. शिंदे आहेत की हे आहेत? मा. आयुक्तांना बोलवून घ्या. महत्वाचा विषय आहे. आम्ही अशी मंजुरी देणार नाही.

**दिपक खांबित :-**

दि. ३१/०१/२००८ रोजी प्रस्ताव सादर केला होता. श्री. आर. डी. शिंदे साहेबांकडून दि. १६/०३/२००८ ला मंजुरी घेतली. हा प्रस्ताव श्री. आर. डी. शिंदे साहेबांकडे गेला होता.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता नवीन आयुक्त आले आहेत. मा. आयुक्तांनी आपल्या पावरमध्ये बोलले पाहिजे. नवीन आयुक्त आहेत त्यांना बोलवा आणि हा खुलासा करुन घ्या. आणि त्यांच्याकडून मत मागवा. ते जर जिम्मेदारी घेत असतील तर आम्ही परमिशन देउन टाकतो. आम्ही जिम्मेदार ठरतो. आम्हाला मतदान करायचे आहे. रेकॉर्डवर आम्ही आहोत. तुम्हाला मतदान करायचा अधिकार नाही.

**मा. सभापती :-**

हा विषय स्थगीत ठेवतो. पुढचा विषय घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अभी मा. आयुक्त को आने दो। अगर आयुक्त आते है। नही तो हमारा यह ठराव है, उसपर मतदान ले लो।

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तांना बोलवा. याच्यामध्ये आमचा व्यक्तिगत विरोध नाही.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ६४, गोषवाऱ्यासहीत पूर्ण विषय पुढच्या सभेत घ्यायला सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्तांनापण बोलवा. या सभागृहामध्ये आम्हाला वाद नको.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझी एक सुचना अशी आहे की, आपल्या बांधकाम विभागाने जे पर्यावरण खाते आहे, जे सी.आर.झेड. डिपार्टमेन्ट जे महाराष्ट्र शासनाचे आहे. त्यांना पत्र पाठवून याबाबतीत खुलासा करावा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आमची अशी विनंती आहे की, सी.आर.झेड. संदर्भामध्ये हा विषय क्र. ६४ आलेला आहे. हा विषय या लोकांनी इथे आणला. प्रशासनाने आणला. आम्हाला मतदान करायचे आहे. उद्या भविष्यात आम्ही गिल्टी ठरणार. कारण सी.आर.झेड.ची परवानगी क्लिअरकट आहे. किंवा नाही हे या ठरावामध्ये कुठेही दाखवलेले नाही. अशा परिस्थितीत ह्या ठरावाचा आम्ही विचार तरी करु शकतो का?

**तुळशिदास म्हात्रे :-**

आपण गिल्टी कसे ठरणार आहोत? आपण जागा ताब्यात घेतली का?

**मिलन म्हात्रे :-**

ताब्यात नसेल तर बिलकुल बोलता येत नाही.

**एस. ए. खान :-**

पहिल्यांदा आपले मा. आयुक्त मा. स्थायी समिती सभेला बसले आहेत. त्याचे मी सर्वांच्या वतीने हार्दिक स्वागत करतो.

**तुळशिदास म्हात्रे :-**

सर्व स्टॅन्डीग कमिटीच्या सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, आपल्याकडे नवीनच मा. आयुक्त आपल्या सभेसाठी प्रथमच आले आहेत. त्याच्याबद्दल मा. आयुक्तांचे आपण आभार व्यक्त करु या.

**मा. आयुक्त :-**

मा. स्थायी समितीने एवढे मोठे मन करुन आभार मानल्याबद्दल मी समितीचे आभार मानतो. मा. अध्यक्ष महोदय आणि मा. स्थायी समितीच्या सर्व सन्मा. सदस्यांना मी सांगु इच्छितो की, ही पहिली सभा

असल्यामुळे माझाही मा. स्थायी समितीचा पहिलाच अनुभव असल्यामुळे मी खास प्रशासनाला सांगितले होते की, मी अटेंड करु इच्छितो. पण मलाही यायला थोडा उशीर झाला. नंतर मोर्चा आला. नंतर मा. अध्यक्ष साहेबांनी त्यांचे थोड काही अर्जंट विषय होते त्याच्यामुळे बोलावले. नंतर आपल्यापैकी काही कौन्सिलर मंडळी विविध प्रश्न घेउन आले म्हणून थोडाफार उशीर झाला. मला मा. स्थायी समितीला सांगायला काही हरकत नाही की, विषयसुची मी काल बघितली आणि आपले सचिव श्री. पाटील साहेब आणि जास्त विषय असलेल श्री. खांबित साहेब यांच्याशी चर्चा केली. फ्रँकली स्पीकींग या कुठल्याही प्रस्तावाबद्दल कोणाचा विरोध असण्याचे काहीही कारण नाही. माझा तर बिलकुल नसणार आहे. त्याच्यामध्ये मी फक्त थोड सजेशन आणि सुचना केल्या होत्या. उदा. हा ६४ नंबरचा जर असेल. तर सी.आर.झेड. वन असेल तर कन्स्ट्रक्शन करता येईल का? आणि मग कन्स्ट्रक्शन करता येत नसेल तर समिती समोर जायला हरकत नाही. परंतु, समितीला वस्तुस्थिती सांगणे आवश्यक आहे. आणि उद्या हायकोर्ट सांगते की, सगळ्या इलिगल बिल्डींग पाडा, मॅनग्रोज हे करा ते करा आणि आपणच स्वतः जर एखादे इलिगल केले तर ज्यांनी कायदा पाळायचा त्यांनीच कायदा तोडला अशी हेडलाईन येईल. त्याच्यात आपल्या सगळ्यांच्याच उत्तर देता देता नाकीनउ येईल. म्हणून समितीला सी.आर.झेड. बद्दल स्पष्ट कल्पना द्यावी. बांधकाम करता येत असेल तर पुढे जावे. बांधकाम करता येत नसेल तर मग बांधकामाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे ऑलरेडी गेलेला आहे. तसे आल्यानंतर पुढे जावे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण जे बालतात ते शंभर टक्के मान्य आहे.

**मा. आयुक्त :-**

हे झाले सी.आर.झेड. बद्दल. माझे एकच म्हणणे आहे की, सी.आर.झेड. मध्ये मा. हायकोर्टाचे व सुप्रीम कोर्टाचे भरपुर जजमेन्ट आहेत हे आपल्याला माहित आहे आणि त्याच्यामध्ये सी.आर.झेड. बद्दल पण आहेत. आणि मॅनग्रोज बद्दलपण आहेत. आय ॲम नॉट अव्हेर की येथे मॅनग्रोज आहेत की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

टिपणीत दिले आहेत.

**मा. आयुक्त :-**

व्हाया मेडीया याच्यातले काढता येईल. व्हाया मेडीया असे आहे की, आपल्याला तिथे गार्डन डेव्हलप करायचे असेल तर सी.आर.झेड. बाधीत न होता सी.आर.झेड. कधी बाधीत होईल, जर आपण काही पक्के बांधकाम सुरु केले तर. माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, बांधकाम कंम्पोनन्ट थोडा मागे ठेवू. गार्डन सुरु करा. गार्डनचे बांधकाम बाकीचे जे काही ॲज इट इज ह्यातले फक्त कन्स्ट्रक्शनचे कंपोनंट मायनस करुन ज्याच्यामुळे सी.आर.झेड. बाधीत होणार नाही अशा सगळ्या गोष्टी करायला आपण सक्षम आहात. पुढे जा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, चालू आहे. तिकडे रोज गार्डन बांधलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

गार्डन बांधलेले असेल. गार्डन ब्युटीफिकेशन, गार्डनमध्ये अनाउन्समेन्ट, गार्डनमध्ये वाढ हे विषय समितीचे आहेत. समिती सक्षम आहे. समिती पुढे जाउ शकते. त्याबद्दल वाद नाहीत. माझी समितीला फक्त एकच विनंती आहे की, समितीने जो निर्णय घेतला आहे. त्या निर्णयामुळे आपल्याच ॲक्टचा कुठे भंग होणार नाही ते बघावे आणि पुढे जावे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आमचा मुद्दा तोच आहे. आमचा मुद्दा एकच आहे. नंबर वन मॅनग्रोज आहेत. नंबर दोन जागा आपल्या ताब्यात नाही. अगोदर काय झाले. याचाही त्यावेळेला आम्ही स्टॅन्डीगला विरोध केला. पण प्रशासन त्यावेळेच्या सत्ताधाऱ्यांना बळी पडले आणि सगळे करत गेले. नंबर तीन ही जागा आजही आपल्या ताब्यात आहे की नाही?

**मा. आयुक्त :-**

मा. जिल्हाधिकाऱ्यांनी ताब्यात दिली अशी माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेबांना विचारा.

**दिपक खांबित :-**

कंडीशनमध्ये दिले आहे की, सदर जमीनीचा मालकी हक्क शासनाचाच राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता मला सांगा, तुम्ही इकडे दिले आहे की, राज्य शासनाकडे फेरवर्गीकरणाचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याबाबत नगररचना विभागाने कळवले आहे. साहेब, याच्यात नगररचना विभागाचे पत्रही नाही. आम्ही काय समजायचे? करा किंवा करु नका, काय कळवले आहे? हे असे फॉल्टी गोषवारे येतात. त्याच्यामुळे सभेचा एक-एक तास फुकट जातो. त्याच्यामध्ये तुम्ही हे जे काम करणार आहात. त्याचे क्षेत्रफळ तरी द्या की, ते मॅनग्रोजपासून एवढे दुर आहे. याच्यामध्ये मॅनग्रोज नष्ट होणार नाहीत. असे काहीतरी क्लिअर करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही आत्ता सांगितले की, ज्यांनी कायदा पाळला पाहिजे. त्यानी कयदा नाही तोडला पाहिजे. सी.आर.झेड.च्या नियमानुसार आपण कोणतेही काम करताना आपल्याला सी.आर.झेड. डिपार्टमेन्टची परवानगी लागते. त्यानुसार आपण आपल्या महाराष्ट्र शासनाची किंवा केंद्र शासनाची परवानगी घ्या आणि नंतर करा. आम्ही नाही म्हणत नाही.

**मा. आयुक्त :-**

याच्यात दुसरा एक व्हाया मेडीया असा आहे की, समितीने आज समितीच्या इच्छेप्रमाणे ठराव मान्य करावा, अमान्य करावा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आमच्याकडे एम.आर.आर.डी.ए. चे श्री. रत्नाकर गायकवाड साहेब आले होते. जे.एन.एन.यु.आर.एम. च्या संदर्भात चर्चा होती. ह्याच मा. आमदारांनी तक्रार केली की, मिरारोडच्या जाफरी खाडीमध्ये मॅनग्रोज तोडून बांधकामे चालू आहेत. ती पाडा. म्हणजे जे मा. आमदार तुम्हाला या कामाला आमदार फंड देतात. त्यांची मिरारोडला ती भुमिका आहे. माझा कशालाही विरोध नाही. मेहेरबानी करुन माझे चुकीचे समजू नका. याच्यामध्ये या अगोदर आपल्या महापालिकेचे एस.आय. जेलमध्ये बसले आहेत. कोर्टात त्यांना तर ठाणे महानगरपालिकेचे पण जेलमध्ये बसले. कोर्टातून जामीन करुन आले. दोन डी.एम.सी. जेलमध्ये बसायच्या तयारीमध्ये होते. हे प्रकार झालेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

माझी विनंती अशी आहे की, मा. आमदार महोदय फंड देत असतील तर महानगरपालिकेला फंड मिळतो तो घेतला पाहिजे. महानगरपालिकेला मा. आमदार, मा. खासदार आणखीन कुठल्या निधीतून पैसे मिळत असतील तर आपण त्याचा जरुर स्विकार केला पाहिजे. त्यासाठी आपली स्किम थोडी मोल्ड करुन बसवली पाहिजे या मताचा मी आहे. तथापी, मी परत रिपीट करु इच्छितो. माझी समितीचे मा. अध्यक्ष आणि समितीला हीच विनंती राहिल की, नियमाचा भंग न होता हा ठराव आणि हा निर्णय पार पाडण्याची जिम्मेदारी प्रशासनावर ठेवा. प्रशासन संबंधीत खात्याकडच्या परवानगी घेउन पुढे जाईल. परवानगी मिळाली नाही तर तशी वस्तुस्थिती देईल.

**शरद पाटील :-**

साहेब, खुर्ची बदलली की, सगळे बदलते. श्री. राम नाईक साहेबांनी त्यावेळेला एक करोड रुपये दिले होते. श्री. मोहन पाटील त्या वेळेला सभापती होते. आणि त्यांनी ते फेटाळले. आपण बोलतात ते बरोबर आहे की, पैसे मिळतात ते घ्या. आम्हाला तिथे काम पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझ्या वॉर्डमध्ये एक मार्केटचे रिझर्व्हेशन आहे. आपल्याकडे एक तर मार्केटच्या जागा राहिलेल्या नाहीत. ओपन प्लॉट आहे. मातीचा भराव आहे. फक्त बिल्डरने कंपाउन्ड वॉल बनवले आहेत. बिल्डरचा प्लान २००३ चा आहे. सी.आर.झेड. झाल्यानतर आहे. मी तिकडच्या स्थानिक नगरसेवक असताना नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांना वारंवार सांगतो. मागच्या मिटींगला पण तेच झाले. पण त्या प्लॉटचा ताबाच घेत नाही. कारण तो सी.आर.झेड. मध्ये बाधीत आहे. तुम्हाला काहीच करायचे नाही. उलट बांधलेले बांधकाम तोडून गेट करुन तुम्ही उद्यापासून बाजार बसवू शकता. तुमचा महापालिकेचा फायदा होतो. लोकांना जवळ एक बाजाराची जागा उपलब्ध होते. पण प्रशासन गेल्या तीन-चार वर्षापासून काहीच करत नाही. कारण सी.आर.झेड. आहे. बांधकामाला परवानगी दिली. मा. आयुक्त श्री. आर. डी. शिंदे यांनी बेकायदेशीर जाउन स्टेट गव्हर्नमेन्टच्या ३७(१) च्या पावर ताब्यात घेउन त्याच्यातून रस्ता काढून दिला. एक्सेस वे काढून दिला. ॲसेंबली क्वेश्चन आम्ही केला. त्याच्यात त्या आयुक्तांच्या इन्क्वायरी चालू झाल्या आहेत. आणि हे जर सगळे सी.आर.झेड. मध्ये होत असेल. तर मग बाकीच्या पब्लिकच्या हिताच्या दृष्टीकोनातून जी कामे येतात. त्याच्यात प्रशासन का अडवते? याचे आम्हाला उत्तर द्या. तुम्हाला फुकट जागा मिळते.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, सी.आर.झेड. मुळे डी.पी. रोडची अनेक कामे थांबलेली आहेत. ती आपण का करुन घेत नाही? ती प्रस्तावित का होत नाहीत?

**मिलन म्हात्रे :-**

तीन वर्षापासून चालले आहे. हे तिसरे आयुक्त आहेत. श्री. शेंडे साहेब, प्लॉटवर येउन गेले. सहाय्यक नगररचनाकार त्या प्लॉटवर येउन गेले.

**एस. ए. खान :-**

आत्ताचे मा. आयुक्त सक्षम आहेत. ते सर्व व्यवस्थित करतील.

**मा. सभापती :-**

हा विषय झालेला आहे. मी त्याचा निर्णय दिलेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

काय निर्णय दिला.

**मा. सभापती :-**

पुरक गोषवा-यासह पुन्हा सादर करावा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही हे बांधकाम बोलतात. तुमच्या भाषणामध्ये तुम्ही म्हणाले की, परमनन्ट बांधकाम नसावे. तुम्ही गोषवा-यात बांधकाम हा शब्द टाकू नका. लॅन्ड फिलींग करा किंवा तुम्ही गवत लावा. असे चालेल.

**प्रशांत पालांडे :-**

सी.आर.झेड. मध्ये लॅन्ड फिलींग चालते का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या श्रीम. शानु गोहिलजी, आपका ठराव और सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, आपका ठराव पिछे ले लिजीए। मै प्रशासन को बोलकर गोषवारे के साथ अगले सभा मे लेने के लिए बोलेंगे।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, पण त्यात माझी सुचना ॲड करा की, प्रशासनाने पर्यावरण खात्याची, सी.आर.झेड. डिपार्टमेन्टची परवानगी घ्यावी आणि ॲटलिस्ट पत्र पाठवून खुलासा करा की, याच्यामध्ये आम्ही करु शकतो की नाही?

**शानु गोहिल :-**

मै जेसल पार्क की स्थानिक नगरसेविका हू और मेरे प्रभाग मे यह काम होने जा रहा है। अभी तक प्रशासनने वहा पर एक करोड रुपया खर्च किया है। एक करोड रुपया गणपती विसर्जन की दृष्टी से किया है। वह बहोत जरुरी था, अत्यावश्यक था इसलीए किया। लेकिन वहॉ पर जब जब खर्च करने की बात आयी, धक्का चौडा करने की बात आयी, तब तब वह विषय स्थायी समिती मे आया है। तब किसका विरोध नही था। तब काम होते गए। लेकिन आज जब पब्लिक के हित मे एक जॉगर्स पार्क हो रहा है। जब की वहा पर मॅनग्रोज का कोई लेना देना नही है। मॅनग्रोज बहोत दुरी पर है। कोई आर.सी.सी.कन्स्ट्रक्शन नही है। सिर्फ एक लॉन करना है। क्योंकी वहा पर सुबह-शाम तीन से चार हजार पब्लिक आता है। उनको देखते हुए हम लोगो ने यह विषय प्रशासन मे लाये। कोई गलत विषय नही है। बिना मतलब वहा पर रोझ गार्डन बनाया गया। बोर्ड लगाया। वहा पर मैदान बनाया गया। मिट्टी डालकर नगरपालिका के पैसे से गार्डन बनाया। वहा पर सब कुछ हुआ है। वहा पर प्याउ बन रहा है। वहा पर नगरसेवक निधी से पुलिस चौकी बन रही है। वहा पर शौचालय बन गया। ऑलरेडी युज हो रहा है। इतना कुछ होने के बाद मे अननेसेसरीली यह प्रॉब्लम क्रिएट किया जा रहा है।

**नगरसचिव :-**

दोन्ही ठराव मागे घेतले का?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुम्ही सगळे व्यवस्थित करुन आणा. आम्हांला कोणाला विरोध नाही.

**शानू गोहिल :-**

मैंने जो ठराव मांडा है वो पिछे ले रही हूॅं।

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब सी.आर.झेड चे बुक बघाल तर त्या सर्व्हे नंबरवर संपूर्ण मॅनग्रोज दाखवलेले आहेत.

**शरद पाटील :-**

ठराव मागे घेत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, एक गोष्ट प्रामाणिक पणे सांगतो. आपण जर तसा विचार करायला गेलो तर भाईंदरमध्ये ऐशी टक्के बांधकाम तुम्ही करुच शकत नाही. आपण ज्या बिल्डिंगमध्ये बसलो ती सुद्धा सी.आर.झेड मध्ये बाधित आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब आम्हांला मा. आयुक्त साहेबांना एक सुचना करायची आहे. ज्या ज्यावेळी स्टॅण्डींग आणि मा. महासभेची टिपणी येतात. आत्ता तुम्ही सांगितले त्याप्रमाणे काही गोष्टी मा. आमदार फंड देतात म्हणून करायला पाहिजे. पण जेव्हा टिपणी देतात. त्यामध्ये प्रशासनाकडून सर्व मोगम असते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब त्याच्यामुळे वाद होतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमची आपल्याला विनंती आहे की, आपल्याला खरोखर जे काही बोलायचे आहे. या टिपणीमध्ये बोलावे. नंतर नाही. याच्यामुळे चर्चा जास्त होते. तुम्ही नंतरची टिपणी बघणार असाल. फार उत्तम आहे. नाही तर दर गुरुवारी स्टॅण्डींग कमिटीची मिटींग लागते. आपण त्या मिटींगची टिपणी बघून त्याच्यामध्ये जे दोष असतील ते दोष सुधारुन आम्हांला टिपणी पाठवा. म्हणजे आमच्यामध्ये वाद होणार नाहीत. मी या सर्व टिपणीच्या बाबतीत आपल्याला एकदा भेटायला आलो होतो. आत्ता पे ॲण्ड पार्कचा विषय झाला. तीन जागा क्लिअर आहेत. आणि पाच जागा बाधित आहेत. तीन जागेची दोन वेळा मुदतवाढ दिली. त्यांना अजूनही मुदतवाढ पाहिजे. त्याचे टेंडर मागवले असता आज पाच वर्षापूर्वी दिलेले पे ॲण्ड पार्क आपल्या इथे वाढली असती. पण त्या पाच बाधित आहेत म्हणून या तीनला आपण पुढे पुढे ढकलायचे काम प्रशासन करते. तर ही चुकीची गोष्ट आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्या विषयी तुम्ही जो मुद्दा उपस्थित केला. तो मी काल स्वतः उपस्थित केला. श्री. पाटील साहेबांना माहिती आहे की, हे उरलेले जे दोन ब्रिजखालचे ईस्ट आणि वेस्टचे जे भाग आहेत. ते पूर्वीच हरास करु शकलो असतो. आत्ता असे आहे की, पाच हजाराच्या पुढचे हरासीचे अधिकार जी.बी.कडे असल्यामुळे प्रत्येक गोष्टीसाठी जी.बी.कडे जावे लागते असे त्यांचे म्हणणे आहे. ठिक आहे. जी.बी. पुढे जाउ द्या. पण आत्ता पुढच्या वेळी ज्यावेळेस तो विषय जी.बी.कडे नेतील त्यावेळेस आपण त्याच्यात एक अशी नोट ॲड करणार आहोत. जे मी त्यांना सांगितलेले आहे की, नवीन पाच किंवा सात जे काही सर्व्हे झालेले, डिस्प्युटेड सर्व्हे, नंतरचे सर्व्हे, जी.बी. जो निर्णय घेईल तो घेईल. तथापि, त्या निर्णयाने बाधित न होता सध्याचे आपले जे एक्झीस्टिंग दोन चालू आहेत. त्याचे टेंडर काढण्याची परमिशन आपण जी.बी. कडून मागवणार आहोत. त्यामुळे आत्ता जी.बी. नाही. ज्यावेळेस जी.बी. होईल त्यावेळेस आपण ठेवू. आणि तोपर्यंत आपल्याला पुढे जावे लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब या सर्व टिपणीबाबत मी भेटायला आलो होतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६५, भाईंदर (प.) टेंभा हॉस्पिटल जागेतील जुन्या इमारती तोडणेसाठी जाहिर निविदा मागविणेबाबत. (मा. उच्च न्यायालयाचे आदेश)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मे. आर्किझमचा जो रिपोर्ट आहे. त्यांनी एक लाख चौदा हजार चारशे सत्याहत्तर मुल्यांकन केलेले आहे. त्यांची जरा माहिती द्याल की कसे कसे केले आहे? १,१४,४७७ कसे काढले तो रिपोर्ट आम्हांला द्या. कारण तिकडे चार स्ट्रक्चर आहेत.

**दिपक खांबित :-**

त्या रिपोर्टची कॉपी तुम्हाला देउ का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठल्या बाबींची किती रक्कम त्यांनी धरलेली आहे. तो रिपोर्ट आत्ता द्या. तुम्ही जे दिले ते सर्व आम्ही मान्य करायचे? त्या बिल्डिंगमध्ये आमचा जन्म झालेला आहे. आपण जर लिलावाने केली तर त्याची आणखीन जास्त रक्कम येणार.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये लिलाव झाला. त्याच्यात जास्तीची किंमत भरली. तुमची एक चौदा डिमांड होती. त्याच्यात एक पंचवीस मिळाले.

**मा. आयुक्त :-**

त्यांचा एक चौदा बद्दल आक्षेप आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एक चौदा आर्किटेक्टने दिले. तुम्हांला लिलावात एक पंचवीस मिळाले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यावरती येउ शकते.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा. हे झालेले आहे. तुम्हांला तुमचे मत मांडण्याचा अधिकार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

फेरनिविदा मागवायचा अधिकार नाही काय?

**मिलन म्हात्रे :-**

सगळे खरे आहे. आपल्याला उच्च न्यायलयाच्या निर्णयामध्ये सहा आठवड्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात करायची होती. प्रशासनाने त्याला पावणे दोन वर्षे घालवली. आत्ता या त्या कारणाने तुम्हाला डिले करायचा असेल तर करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

डिलेचा प्रश्न नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तिकडे डेड बॉडी ठेवायला जागा नाही. लोकांची हालत काय आहे? लाखो रुपये लूटून खातात त्याचे बघा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही स्ट्रक्चर तोडता. ते पण महापालिकेचे नुकसान करायचे?

**मिलन म्हात्रे :-**

कितीचे नुकसान झाले आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब त्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्याच्यामध्ये जुनी सागाची लाकडे आहेत. त्याची कॉस्टींग जास्त आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ती लाकडे शंभर वर्षापूर्वीची आहेत. मी सुतारकाम करणारा माणूस आहे. त्याच्यामध्ये काही येणार नाही. ती आपली लाकडे पोकळ झालेली असतात. तो दवाखाना १९३२ चा आहे. त्याचे डेफ्रिसिएशन काढाल की नाही?

**मा. आयुक्त :-**

जास्त मोठी रक्कम नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब त्याच्यात तरी तुम्हांला जवळ जवळ अकरा हजार जास्त मिळाले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला जरा आर्किझमध्ये द्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्यांची सुचना घ्या आणि मी ठराव मांडतो. भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटलची नगर भुमापन क्र. ७५९ ते ७७१ ही जागा जिल्हा परिषद ठाणे यांचेकडून मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नावे दाखल करण्यात आलेली आहे. मा. महासभा दि. १६/०४/२००७, ठराव क्र. ०३ अन्वये भाईदर (प.) टेंभा हॉस्पीटल इमारत, स्टाफ क्वार्टर बांधणे कामाच्या रु. ८,९१,५१,९८४/- रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी प्राप्त आहे. परंतु सद्यःस्थितीत सदर जागेवर जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारती अस्तित्वात आहेत. नविन हॉस्पीटल इमारत, स्टाफ क्वॉर्टर बांधणेसाठी प्रथम जुन्या इमारती तोडाव्या लागणार आहेत. सदर कामी दि. ०५/०२/२००८ रोजीच्या दै. सम्नित्र/ दै. हमारा महानगर या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालील ठेकेदारांनी निविदेचे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र | कामाचे / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटलच्या जागेतील जुन्या इमारत तोडणे. | |
| | १) मे. ऑल इंडिया | रु. १,०५,००० /- |
| | २) मे. विलास एन्टरप्रायजेस | रू. १,१०,९२५ /- |
| | **३) मे. भरत टिंबार मार्ट** | **रू. १,२५,००० /-** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदाराने सादर केलेली मे. भरत टिंबार मार्ट यांची जास्त दराची निविदा आहे. सदर कामी मे. आर्किझम यांनी सादर केलेले टेंभा हॉस्पीटल आवारातील जुन्या इमारतींचे रू. १,१४,४७७/- एवढे मुल्यांकन केलेले आहे. निविदेत सादर केलेले मे. भरत टिंबार मार्ट यांचे दर रू. १,२५,०००/- असून सदरील दर मे. आर्किझम यांनी सादर केलेल्या मुल्यांकना पेक्षा जास्त आहेत. तरी सदर जागेवरील जुन्या इमारती तोडणे कामी लिलाव रकमेस मान्यता देण्यात येत आहे.

**गणेश शेट्टी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव वाचून कायम करण्यांत आला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब याच्यामध्ये तुम्ही सुचना घ्यायची आहे ते हॉस्पीटल १९३२ सालाचे आहे. मी १३/०२/२००८ रोजी पत्र दिलेले आहे. त्या हॉस्पिटलमध्ये जी जूनी पाटी आहे. शंभर वर्षापूर्वी ज्यांनी ते हॉस्पीटल बनवलेले आहे. त्यांचे फोटो आहेत आणि ज्या लोकांना दानधर्म म्हणून पैसे दिले त्यांची पाटी आहे. आपण त्या ठेकेदाराला ते त्या कचऱ्यामध्ये फेकायला लावू नका. ते आपल्या ताब्यात घ्या आणि ती सुरक्षित ठेवून नविन हॉस्पिटल बांधून ती कुठेतरी लावा. या ठरावामध्ये माझी सुचना नमुद करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

ग्रामपंचायतीच्या ऑफीसमधले अख्खे सांबर चोरीला गेले. त्यावेळेला इकडे कोणाचे सरकार होते. ते एवढे मोठे सांबर शिंग होते ते लोकांनी लिलावामध्ये उभ्या उभ्या चोरून नेले. ते आज असते तर तुमच्या महापालिकेची शान होती. करायला गेलो तर सगळाच हिशोब ठेवायला लागतो.

**नगरसचिव :-**

सुचनेसह ठराव कायम करण्यांत येत आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ६५ :-**

भाईंदर (प.) टेंभा हॉस्पिटल जागेतील जुन्या इमारती तोडणेसाठी जाहिर निविदा मागविणेबाबत. (मा. उच्च न्यायालयाचे आदेश)

**ठराव क्र. ५१ :-**

भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटलची नगर भुमापन क्र. ७५९ ते ७७१ ही जागा जिल्हा परिषद ठाणे यांचेकडून मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नावे दाखल करण्यात आलेली आहे. मा. महासभा दि. १६/०४/२००७, ठराव क्र. ०३ अन्वये भाईदर (प.) टेंभा हॉस्पीटल इमारत, स्टाफ क्वार्टर बांधणे कामाच्या रु. ८,९१,५१,९८४/- रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी प्राप्त आहे. परंतु सद्यःस्थितीत सदर जागेवर जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारती अस्तित्वात आहेत. नविन हॉस्पीटल इमारत, स्टाफ क्वॉर्टर बांधणेसाठी प्रथम जुन्या इमारती तोडाव्या लागणार आहेत. सदर कामी दि. ०५/०२/२००८ रोजीच्या दै. सम्नित्र/ दै. हमारा महानगर या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालील ठेकेदारांनी निविदेचे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र | कामाचे / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटलच्या जागेतील जुन्या इमारत तोडणे. | |
| | ४) मे. ऑल इंडिया | रु. १,०५,००० /- |
| | ५) मे. विलास एन्टरप्रायजेस | रू. १,१०,९२५ /- |
| | **६) मे. भरत टिंबार मार्ट** | **रू. १,२५,००० /-** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदाराने सादर केलेली मे. भरत टिंबार मार्ट यांची जास्त दराची निविदा आहे. सदर कामी मे. आर्किझम यांनी सादर केलेले टेंभा हॉस्पीटल आवारातील जुन्या इमारतींचे रू. १,१४,४७७/- एवढे मुल्यांकन केलेले आहे. निविदेत सादर केलेले मे. भरत टिंबार मार्ट यांचे दर रू. १,२५,०००/- असून सदरील दर मे. आर्किझम यांनी सादर केलेल्या मुल्यांकना पेक्षा जास्त आहेत. तरी सदर जागेवरील जुन्या इमारती तोडणे कामी लिलाव रकमेस मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन व. म्हात्रे. अनुमोदक :- श्री. गणेश गो. शेट्टी.**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी खालीलप्रमाणेसुचना मांडली.**

जुन्या इमारती तोडण्यापूर्वी त्यांचे फोटो चित्र काढून घेण्यात यावे.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६६, भाईंदर (प.) टेंभा हॉस्पिटल येथे शवविच्छेदन गृह बांधणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे (मा. उच्च न्यायालयाचे आदेश)

**मिलन म्हात्रे :-**

भाईदर (प) टेंभा हॉस्पीटल येथे शवविच्छेदन गृह बांधणे कामी मा. श्री. मिलन म्हात्रे नगरसेवक हयांनी आपल्या **सन २००७-०८** या वर्षाच्या नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी मधून मागणी केलेली आहे. सदर निधी रु. **६,८६,०००/-** एवढा शिल्लक आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक **रु. ३६,२२,८६५/-** एवढया रक्कमेचे तयार करण्यात आलेले आहे. भाईंदर (प) हॉस्पीटल बांधणे या लेखाशिर्षात उर्वरीत खर्चाकरीता

तरतूद केलेली आहे. तरी सदर अंदाजपत्रकास व निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचा ठराव आहे. आम्ही पहिल्यांदा याच्यावर चर्चा करतो. पहिली गोष्ट, नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी कोणत्या वर्षाचा आहे. आणि कधी प्रस्तावित केलेला आहे. आणि या ठरावामध्ये एकूण खर्च छत्तीस लाखाचा दाखवलेला आहे आणि जो नगरसेवक निधी किंवा प्रभाग निधी घेतला तो सहा लाखाचा आहे. आज ती वास्तू झाल्यांनतर सहा लाखामध्ये श्री. मिलन म्हात्रे किंवा अन्य नगरसेवकांनी निधी दिला त्यांच्या नावाची पाटी लावायची. उद्या मी एक लाखे रुपये दिले तर ती पाटी लावायची की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही तुमची लावा. तुम्ही पोलिस खात्याला तुमचा नगरसेवक निधी दिला. तुमच्या निधीने तुम्ही चौक्या उभारल्या. ज्या बेकायदेशीर आहेत. मा. हायकोर्टाच्या ऑर्डर आहेत. आत्ता तुटतात. तुमच्या नगरसेवकांनी तिकडे नगरसेवक निधी दिला. मा. हायकोर्टाच्या ऑर्डरवर मी उद्या मा. आयुक्तांना पत्र देतो की त्या चौक्या पाडा. आत्ता काय बोलणार ते बोला. माझी स्वेच्छा आहे. माझ्याकडे महानगरपालिकेने जे सहा लाख दिले. ते मी वर्ग केले. विषय संपला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चार गोष्टींचा खुलासा करावा. नगरसेवक निधी प्रभाग निधी हा......

**मिलन म्हात्रे :-**

आम्हांलाही खुलासा करुन द्या की, तुम्ही नगरसेवक निधीमधून पोलिस चौक्या बांधू शकता का? ज्या पोलिसांच्या मालकीच्या जागा आहेत. ते उत्तर महापालिकेने द्यावे. तुमच्या जमिनीच्या व्यतिरिक्त तुम्ही खर्च करु शकता का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी तर बोलतो, जिथे जिथे नावे लागली आहेत. ती सगळी काढून टाका.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न नावाचा नाही. आम्ही कुठे बोलतो की, आमचे नाव लावा. आमचे इंटेशनपण ते नाही. ज्या नगरसेवकांनी हरकत नोंदवली आहे त्या श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांचे त्या पोलिस स्टेशनला त्या चौक्यांना नावे आहेत. तुमचे नगरसेवक श्री. पांगेचे तिकडे नाव आहे. ग्लो शाईनचा बोर्ड आहे. आम्ही ते केले नाही आणि करणारही नाही. विरोध करता तर मग सगळ्या विरोधांना तयार रहा. उद्या उच्च न्यायालयाची ऑर्डर आणून मी तुम्हाला देईन आणि तुम्हाला त्या चौक्या पाडायला लागतील. मुंबईला पाडायला सुरूवात झालेली आहे. आम्हाला ते करायचे नाही. मा. महापौरांनी आझाद नगरला पोलिस चौकीला जागा दिली. आम्ही बेकायदेशिर करत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण ठरावच असा करू या की, कुठलीही नावे लागली असतील तेवढी काढण्यात यावीत.

**मिलन म्हात्रे :-**

आपले अगोदरचे ठराव आहेत. मी म्हणतो की, त्यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतून नउच्या नउ लोकांचा पैसा द्यावा. माझा निधी मी गेल्यावर्षी दिला आहे. माझ्याकडे मा. हायकोर्टाची ऑर्डर आल्याबरोबर मी वर्ग केला.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब, ही जी तुमची निधी दिलेली आहे. ती निधी तुमच्या वॉर्डमध्ये का वापरू नये.

**मिलन म्हात्रे :-**

कुठेही वापरू शकतो. हॉस्पीटल, स्मशानभुमी, बगीचे हे पब्लिक प्लेस आहेत. कुठेही वापरू शकतो.

**मा. सभापती :-**

आत्ता ह्या नगरसेवकांचे एकच मत आहे की, तुम्ही एकटेच का देणार? आम्ही सर्व देणारे आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही पण द्या.

**मा. सभापती :-**

सर्व देणार आहेत. चालेल.

**मिलन म्हात्रे :-**

सर्वांनी द्या. आम्ही कुठे नाही म्हणतो ते काय माझे स्वतःचे आहे? उलट चांगले आहे. बजेटमध्ये तरतुद जास्त होईल. लेखी पत्र घ्या. श्री. मिलन म्हात्रे यांनी लेखी पत्र दिले आहे. प्रभाग अधिकारी हजर आहेत ते बोलले की, तुमचा निधी लॅप्स होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नगरसेवक निधी, प्रभाग निधी हा कुठल्या वर्षाचा आहे? याच्यात त्याचा उल्लेख केलेला नाही. ज्या दिवशी पत्र दिले ती तारीख आम्हाला सांगा आणि त्या काळामध्ये.......

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, जर एखाद्या नगरसेवकाने आपला नगरसेवक निधी दिला असेल तर चांगली गोष्ट आहे आणि जर इतर नगरसेवकांची द्यायची इच्छा असेल तर त्यांनाही सुचित करा. आत्ता स्टँडींगमध्ये हा विषय आला. मा. महासभेमध्ये सुद्धा बरेचसे नगरसेवक आहेत ज्यांना निधी द्यायचा असेल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेमध्ये आणि बजेटच्या सभेमध्येच बोललो आहे. ज्यांना कोणाला द्यायचा आहे ते देउ शकतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, यांचे म्हणणे असे आहे की, २००६-०७ चा जो निधी आहे. तो लॅप्स झाला आहे का? त्यांना त्याचा खुलासा पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

लॅप्स होईल.

**दिपक खांबित :-**

जो २००७ पर्यंतचा निधी असतो. ३१ मार्च २००८ नंतर आपला जो निधी असतो तो लॅप्स होतो. तो पुढे येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. दोंदे साहेब, मी तुम्हाला पत्र कधी दिले? १ मार्चला दिले आहे. नवीन आर्थिक वर्ष चालू झाले होते. १ मार्च २००७, आपण बोललात की, निधी लॅप्स होईल. मी बोललो होतो की, तुम्ही पत्र द्या. तो निधी लॅप्स कसा होतो? ३१ मार्च २००८ च्या संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत माझा निधी राखीव राहील. हे लक्षात घ्या. आणि माझा जो प्रभाग निधी, तुमच्याकडून मला कन्सेंट मिळाले की, तुमचा निधी आहे तुम्ही वर्ग करा. श्री. महेंद्रसिंग चौहान, तुम्ही आले होते आणि श्री. किणी त्यांच्यानंतर माझी स्वेच्छा आहे. मी कुठेही देउ शकतो. महापालिकेची जागा आहे. सगळे नगरसेवक देउ शकतात. काही बंधन नाही. आम्ही कोणाला बंधन घातलेले नाही. आम्ही जागरूक होतो म्हणून दिले. कारण ऑर्डरच मी आणली. माझी इच्छा आहे की, तिकडे पोस्टमार्टम रूम लवकर बांधावी. मी आत्ता सगळ्या नगरसेवकांना विचारतो. उच्च न्यायालयाची ऑर्डर झाली त्याला पावणेदोन वर्ष झाली. दोन वर्ष फुकट गेली. कुठल्याही नगरसेवकाने निधी का दिला नाही? ह्याचे उत्तर पहिल्यांदा सगळ्यांनी द्यावे. जर आमच्यावर बोट ठेवायला लागले तर आम्ही सरळ करणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब चुकत असतील किंवा विसरत असतील. मी मा. महासभेत बोललो होतो. आपली जी शाळा आहे. सर्व शाळांमध्ये प्रत्येक नगरसेवकाने एक एक लाख रूपये दिले तर एका वर्षामध्ये एक एक शाळा आपण उभी करू शकतो नव्वद लाख रुपये नगरसेवकांच्या फंडातून होतात. ही सुचना मी केली होती तुम्ही काय बोलता की मी केली. पण कोणीही तयार होत नाही. नगरसेवक निधी वापरता म्हणून आमचा विरोध नाही. हे सहा लाख रुपये दिलेले आहेत. याच्यामध्ये एक तर उल्लेख झाला पाहिजे या पार्टीमध्ये उल्लेख होणार नाही. होणार असेल तर किमान एवढा फंड दिल्यानंतर नगरसेवकांचा उल्लेख होणार आहे.

**मा. सभापती :-**

आपण जी दवाखान्याची इमारत बांधायची आहे किंवा आपण जो पोस्टमार्टम रुम बांधणार आहोत. श्री. खांबित साहेबांना मी एकच विनंती करतो की, सर्व स्टॅण्डींगच्या सभासदांची नावे ज्या दिवशी एप्रिल महिन्यात चालू करु, त्या दिवशी सर्वांची नावे लागली पाहिजेत.

**मिलन म्हात्रे :-**

आणि तुमच्या अगोदरच्या ठरावानुसार तुमच्या पाटयांवर शहरामध्ये भलत्या सलत्या कोणाची नावे लावली आहेत. त्या पाट्यांचे काय कराल? जो माणूस नगरसेवक पण नाही. मग तुम्हांला व्यवस्थित निर्णय द्यावा लागेल.

**मा. सभापती :-**

मी आत्ताची गोष्ट करतो. आत्ता जे सभासद आहेत. आणि आपले अधिकारी.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महापालिकेचे सगळे रस्ते हे महापालिकेच्या मालकीचे आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या एका नगरसेवकाने नगरसेवक निधीमधून आमच्या वॉर्डमध्ये ज्यांची नावे लागायला नाही पाहिजे, त्यांची नावे लावली आहेत, त्याबद्दल आपले काय म्हणणे आहे?

**मा. सभापती :-**

मग तुम्ही आक्षेप का घेत नाही?

**मिलन म्हात्रे :-**

मी आक्षेप घेतला. लेखी दिले आहे. तुमच्या नगरसेवक निधीमधून कसा यूज करायचा? तुमचे अधिकारी त्याचा बेकायदेशीर वापर करतात कुठलीही कोणाचीही नावे घालतात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाच्या खाली श्री. गिल्बर्ट मेंन्डोसा यांचे नाव आहे. म्हणजे छत्रपती इक्वीलन्ट टू हिम. तुम्ही काय चालले आहे? उद्या मी दाउद इब्राहिमचे नाव प्रपोज करतो. तुम्ही द्या दाउद इब्राहिमचे नाव. अरुण गवळी, दाउद इब्राहिम भरपूर पडले आहेत. हे काय चालले आहे? तुम्ही ठरावानुसार बोलायचे. ठराव फक्त एवढाच आहे की, जो नगरसेवक आपला प्रभाग निधी देईल तो मा. महापौर, मा. उपमहापौर, स्टॅण्डींगचे सभापती साहेब ठराव काढून वाचा. हा विषय फार गहन आहे. शहरामध्ये सगळीकडे पाट्या लागलेल्या आहेत. मी वॉर्डचा नगरसेवक आहे. पण आमचे नाव कुठेही नाही. आम्ही नावाला हपापलेले नाही. आम्ही कामाने मोठे होतो. ज्या महापौरांनी सभागृहामध्ये हॉस्पिटलला विरोध केला. ते लोक आत्ता इलेक्शनला बेनिफिट घ्यायला बघतात. तोही एक भाग आहे. आम्ही नावाचे मी कुठे बोललो की मी नगरसेवक निधी देतो. माझे नाव लावा. माझे पत्र वाचून दाखवा. उलट त्यांनी विरोध केला की, तुमचे लॅप्स होईल. मला सभाशास्त्र काय आहे आणि नियम चांगले माहिती आहेत. मला कोणी सांगू नये. माझा निधी मी जरी वॉर्डमध्ये वापरला तरी गटारे, नाले मजबूत आहेत. कोणीही येउन चेक करावे.

**शरद पाटील :-**

साहेब मला जरा या गोष्टीवर खुलासा पाहिजे. हा प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी दोन्ही आहे का? तुमच्यावर बोट ठेवून बोलत नाही. प्रभाग निधी हा आपल्या वॉर्डमध्येच वापरला पाहिजे असे आमच्या प्रभाग अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले होते. मग तो दुसऱ्या वॉर्डमध्ये का वापरला जातो? मला आत्ता याचा खुलासा पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

कायद्यात तरतुद आहे का? साहेब आत्ता स्मशानभूमी आहे. महापालिकेची भाईंदर वेस्टची एकच स्मशानभूमी आहे. त्याच्यात सगळे नगरसेवक देउ शकतात. आपण लोकप्रतिनिधी आहोत. मग तो अधिकारी चुकीचा आहे. मा. आमदार निधी माणूस कुठेही देउ शकतो. लोकसभेचा जो संसद आहे.

**शरद पाटील :-**

साहेब आम्ही दुसऱ्या वॉर्डमध्ये वापरत होतो. आम्हांला तो प्रभाग निधी वापरू दिला नाही. आम्हांला याचा खुलासा मा. आयुक्त साहेब आपण आत्ता करावा.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या प्रभाग समिती सभापतींनी पण तेच केले होते.

**नयना म्हात्रे :-**

कोणत्या अधिकाऱ्याने बंदी घातली नाही. मा. महासभेने हा निर्णय घेतला. त्यावेळेला मा. महापौरांनी निर्णय दिला की, आपला प्रभाग निधी आपल्या वॉर्डमध्ये वापरावा. तुम्ही कुठल्याही अधिकाऱ्याला याच्यामध्ये दोषी ठरवू नका.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव घ्या आणि त्याचा विचार करा. तो ठराव आपण असताना मागच्या हाउसला झाला होता.

**शरद पाटील :-**

साहेब प्रभाग समितीच्या वेळेला त्यांनी वापरायचा नाही म्हणून आम्हांला सांगितले दुसऱ्या वॉर्डमध्ये प्रभाग निधी वापरू शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे. ते आम्हांला पत्र देतील.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. म्हात्रे साहेबांना नक्की माहिती आहे की, हे दुसऱ्या वॉर्डमध्ये वापरु शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

वापरु शकतो.

**मा. सभापती :-**

मागे मी गणेश देवल नगरला वापरत होतो. तेव्हा तुम्ही आक्षेप घेतला होता की, तुम्ही वापरु शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

कधीच नाही. मी तर बोलतो वापरा. अजून माझ्या वॉर्डमध्ये द्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

यावर प्रशासनाने खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

पूर्ण मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये कुठेही वापरू शकतो. फक्त प्रभाग निधी हा त्या प्रभागापुरताच वापरायचा.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता त्याच्यात तुम्हांला सांगतो. महानगरपालिकेच्या स्मशान भूमी झाल्या. त्याच्यात तर लोकोपयोगी कामे होतात, स्मशानभूमी, गार्डन्स, हॉस्पिटल्स जी काही वॉर्ड ऑफिसेस आहेत ती समजा आता एखाद्या वॉर्ड ऑफिसला पाणपोई बनवायची आहे. मला वाटले माझा निधी द्यावा. साहेब बरेचसे वॉर्ड असे आहेत की सगळे झालेले आहे. तिकडे काही कामच बाकी नाही. अनेक ठिकाणी पाच लाखाची कामे काढली जातात, प्रत्यक्षात तीन लाखाची केली जातात. रंगरंगोटी केली जाते, काम दाखवले जाते, आम्हांला सगळे माहिती आहे. कुठल्या कुठल्या वॉर्डमध्ये चालले आहे तेही मी तुम्हांला दाखवेन. वर्क ऑर्डर किती वेळा निघाल्या. तेही दाखवतो पण जे पब्लिक प्रिमायसेस आहेत. त्याच्यामध्ये कोणी जायचे याच्यात बंधन कुठे आहे? मला तुम्ही लेखी द्या की तुमचा नगरसेवक निधी किंवा प्रभाग निधी वापरता येत नाही.

**दिपक खांबित :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील २९ मध्ये क्लिअरकट तरतुद आहे की, निधी त्या त्या प्रभागातच वापरला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रभागात काम नसेल तर साहेब यांनी प्रभाग निधीमध्ये रस्त्याच्या बाजूला रेलिंग लावली. एका बाजूला लेफ्टला रेलिंग आहेत आज चला. दहा फुटाला रेलिंग आहे. आठ फुटाला रेलिंग नाही. परत पुढे दहा फुटाला आहे. विचारले की हे काय झाले? प्रभाग निधी वापरायला पैसा कुठे वापरायचा प्रश्न पडला आहे. रस्त्याच्या एका बाजूला रेलिंग आहेत आणि एका बाजूला रेलिंग नाहीत. दादर सारख्या ठिकाणी, आपण मुंबईला फिरलेली माणसे, चर्चगेटला फुटपाथला रेलिंग नाहीत. इथे रेलिंग लावली गेली आहे. म्हणजे आमचा दृष्टीकोन खराब नाही. आमचे इंटेशन क्लिअर आहे. मला पत्र द्या की तुमचा निधी वापरता येत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब एक प्रश्न विचारायचा आहे. आपण ३६ लाखाचे शवागृह दाखवले आहे. मग मेन इमारतीमध्ये शवागृह येणार आहे की, नाही ? का हे वेगळे बांधणार आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब आज आपल्या महानगरपालिकेने आठ करोड एक्यावन्न लाख रुपयांचे बजेट तयार केलेले आहे की, टेंभा हॉस्पिटल बांधायचे आहे मग ते टेंभा हॉस्पिटल बांधताना हे सभागृह विसरून गेले होते मग हे कसले इंजिनियर? मग ह्यांनी काय केले? मग आठ कोटी रुपये कसले? त्यांनी काय एस्टीमेट केले? ते शवागृह फार इम्पॉटंट आहे. पोस्टमार्टम रूम फार इम्पॉटंट आहे.

**मा. सभापती :-**

पोस्टमार्टेम रुम त्याच्यात येउ शकत नाही. ते सेपरेट असते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब मान्य करतो. पण आठ करोड एक्यान्नव लाख रुपेय एस्टीमेट त्यांनी केले. मग त्या एस्टीमेटमध्ये त्यांनी सेपरेट बिल्डिंग केली पाहिजे. मग त्यांनी का केली नाही? मा. आयुक्त साहेब मागे जो विषय झाला की, आपल्याला टेंभा हॉस्पिटलचे स्ट्रक्चर तोडायचे आहे. आत्ताच मागच्या महिन्यामध्ये या लोकांनी लाखो रुपये खर्च केले. रंगरंगोटी केली. त्याच्यामध्ये वायरिंग केली. सगळे केले. तेव्हा त्यांना कळले नाही. की आपल्याला एक महिन्यामध्ये तोडायेचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उच्च न्यायालयाच्या निकालामध्ये त्यांनी क्लीअर दिलेले आहे ज्यांनी तो वाचलेला नाही त्यांना वाचवा. तुम्ही कोणतीही एक्झीस्टींग सेवा बंद करायची नाही. साहेब, मा. आयुक्त म्हणून तुम्हाला बंधन आहे, हे आज सांगतो. तुमच्याच मा. महापौरांनी विरोध केला होता. तुम्ही माझा ठराव फेटाळला त्याच्यावर मी मा. हायकोर्टातून ऑर्डर आणली. त्यांना एक विचारा, हॉस्पीटल चालू पाहिजे की बंद पाहिजे? कम टू द पॉइंट तिकडे रंगरंगोटी चालली आहे म्हणजे तुमचे ते स्ट्रक्चर दिड दोन वर्षे राहणार आहे. रंगरंगोटी करणारा माणूस कोणी वेडागबाळा नाही. आज तुमच्या कोर्टाच्या ऑर्डरमध्ये सरळ दिले आहे. तुमचे बाकीचे इमले तोडावे लागणार आहेत. आणि नंतर तीपण तुटणार आहे. पण त्याला दोन वर्षे लागणार आहेत. आज दोन वर्षानंतर जी वस्तु तुटणार आहे तिकडे लाईट लावायची नाही का? याचे कोणी विचारले? इंजिनिअर आले, त्यांनी बघितले आणि काम केले. उगाच विषयाला फाटे फोडू नका. हे माझे स्वतःचे नाही. तुमचे ओपिनिअन तुम्ही मांडा तुम्ही इथुन सुरूवात करता मग तुम्ही रूलिंग द्या की, श्री. मिलन म्हात्रे यांचा नगरसेवक निधी किंवा प्रभाग निधी का वापरण्यात येउ नये? तसे त्यांना लेखी पत्र देउन टाका. मग मी फेस करतो.

**मा. सभापती :-**

तुम्हाला श्री. खांबित साहेब बोलले की, प्रभाग निधी वापरू शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या वॉर्डमधली गोष्ट करतो. परत परत सांगतो विषयांतर करू नका आणि अधिकारीपण तुम्हाला टोप्या लावतात. एक लक्षात घ्या की, महापालिकेचे हॉस्पीटल ही कोणाची नगरसेवकाची पण जागीर नाही. ती

पब्लिक प्रिमायसेस महापालिकेची ॲसेट्स आहे. त्याच्यात आम्ही लावणार त्याच्यात आमचा नगरसेवक निधी लागणार. तुम्ही लिहून द्या.

**मा. सभापती :-**

मग सर्वांनी द्या. मी सांगितले की, ज्यांना द्यायचे असेल त्यांनी ३१ तारखेपर्यंत.....

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही डिक्लेअर करता. मग श्री. खांबित साहेबांचे नाव कशाला सांगता?

**मा. सभापती :-**

प्रभाग निधी घेउ शकत नाही असे ते बोलले.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला ते घ्यावा लागेल.

**मा. सभापती :-**

कशाला घ्यायला लागणार?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मला लेखी द्या.

**मा. सभापती :-**

प्रशासन लेखी देईल.

**मिलन म्हात्रे :-**

असे नसते. ती नगरपालिकेची वास्तु आहे. आम्ही त्याला देणार. शाळेला देणार. हॉस्पीटलला देणार. स्मशानभुमीला देणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, ३६ लाख २२ हजाराची तुमची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी आहे. सत्तेवाले ६ लाख रूपये देतात. तीस लाखाची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी घेतली आहे का? हे तुम्ही सांगा. टोटल खर्च ३६ लाख दाखवलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ज्यावेळेला पत्र दिले. त्यावेळेला आपल्याकडे फक्त एक करोडची तरतुद होती. ज्यावेळेला मी १ एप्रिलला पत्र दिले त्या बजेटची फिगर बघा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, आम्हाला बोलू द्या. आम्ही बोलतो तेव्हा दुसरे का बोलतात?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

३६ लाखाची आर्थिक व प्रशासकिय रक्कमेची तुम्ही फिगर दाखवीली आहे. ६ लाख हे देणार आहेत. अजुन ३० लाख बाकी आहेत. तो विषय महापालिकानंतर आणणार आहे किंवा कधी देणार हे माहिती नाही. हे सर्व स्पष्ट झालेले नाही. आम्ही यांचा पैसा घेउ नका. यांना द्यायला देउ नका. आमचा काही विरोध नाही. एकतर प्रशासनाने ३६ लाखामध्ये ३० लाखाची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी किंवा अन्य नगरसेवकांना कळवून की, आम्ही ही वास्तु बांधतो कोणाला निधी द्यायचा असेल तर यामध्ये निधी द्या. नाहीतर ३६ लाखामध्ये ६ लाख यांचे, ३० लाखाची प्रशासकिय मंजुरी घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

पावणे दोन वर्ष झाली. तुम्ही का दिले नाही? पावणे दोन वर्ष दोन वर्षाची दिली पाहिजे. तुम्ही एक तर दिली नाही आणि आत्ता कंटाळा करता परत तुम्ही लोकांमध्ये खोटे प्रचार करता की, आम्ही बनवले. कोर्टात केसेस आम्ही लढायच्या. निर्णय आम्ही आणायचे आणि प्रचार तुम्ही करायचे. पावणे दोन वर्षे तुम्ही काय केले याचे उत्तर द्या.

(सभागृहात गोंधळ.)

**मा. सभापती :-**

तुम्हाला हॉस्पीटल करायचे आहे की, नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चार दिवसानंतर नविन प्रभाग समिती व नगरसेवक निधी लागू होणार आहे. आमचे असे म्हणणे आहे की, त्यांनी गैरसमज करून घेतला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते गेल्या वर्षीचे पत्र आहे. तुम्ही काय बोलता कळते का? माझा २००७-०८ चा प्रभाग निधी लॅप्स करायचे तुमचे धंदे आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग तुम्ही तीस लाखाचे काय करणार?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आम्ही बोलतो म्हणजे माझा प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी लॅप्स होणार, एवढे मला माहिती आहे. एक वर्ष तुम्ही का केले नाही?

**दिपक खांबित :-**

त्यांनी मागणी केली त्याप्रमाणे दिलेले आहे. प्रभाग समितीचा निधी वापरण्याकरिता प्रभाग समितीचा ठराव व्हायला लागतो. आणि आपण प्रभागामध्ये फक्त त्या वॉर्डचीच कामे घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक उत्तर द्या. माझ्या वॉर्डमध्ये प्रभाग निधी खर्च करून करण्याएवढे काम नसेल तर मी त्या पैशाचे काय करायचे? बी टेक्नीकल. माझ्याकडे गटार, फुटपाथ वगैरे सगळे झाले आहे. यांच्यासारखे तुम्ही ग्रील लावणार का?

**दिपक खांबित :-**

तिकडे काम प्रस्तावितच करायचे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

दहा फुट ग्रील लावायची, पुढे आठ फुट सोडायचे, परत दहा फुट लावायचे का तर नगरसेवक निधी टाकायला पैसे कुठे टाकायचे? आम्हाला हॉस्पीटलला गरज आहे. तुम्ही बोलणारे कोण?

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, एक माझ्या प्रश्नाचे उत्तर हवे होते. जी नउ कोटीची हॉस्पीटलची प्रस्तावित इमारत आहे. त्याच्यामध्ये शवविच्छेदन केंद्र आहे की नाही?

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये ठेवले तर चांगलेच आहे पण नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, २६ लाखाचा खर्च आहे. सहा लाख रूपये देतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आज हे नउ करोड रूपये खर्च करून आपण टेंभा हॉस्पीटल बांधतो आज आपल्या प्रशासनाने काय भुमिका घेतली? त्यांनी मा. महासभेमध्ये विषय कुठे आणला? साहेब, आज आपण नउ करोड रूपये खर्च करतो. त्याच्यानंतर त्याच्यामध्ये इन्स्ट्रुमेंट आणायचे आहेत. त्याच्यानंतर डॉक्टर्स आणायचे. त्याच्यानंतर तो खर्च. साहेब हा जो विषय आहे. आज जे नउ करोड रूपये आहेत. आपल्याकडे एवढी जागा आहे. त्याच्यामध्ये आपण जर बी.ओ.टी तत्वावर केले किंवा हे स्ट्रक्चर एखादा बिल्डर किंवा एखादा व्यापारी किंवा एखादी ट्रस्ट जर ती इमारत आपल्याला फ्री ऑफ कॉस्ट बांधून देत असेल आणि त्याच्याऐवजी आपण त्याला एखादी छोटीशी जागा किंवा काही एक्स.वाय.झेड. आपण त्याला जर दिले तर याच्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेचा फायदा होईल. आणि आपला येणारा खर्च वाचेल. हा विषय कोणी आणतच नाही. आणि हे ३६ लाखाचे बजेट.....

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय आला. इकडे कोणीही वकालत करू नये. कोर्टाने स्पष्ट सांगितलेले आहे की, सेक्शन २७ नुसार महानगरपालिकेचे हॉस्पीटल बनवणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे. ते महानगरपालिकेने स्वतःच्या अधिपत्याखाली चालवायचे आहे. साहेब, इकडे विषयाला मुद्दाम फाटे फुटत चालले आहेत. सगळ्यांनी ऑर्डर सर्क्युलेट करा. ऑर्डर वाचतील आणि पुढच्या वेळेला जी काही चर्चा करायची ती करा.

**ध्रवकिशोर पाटील :-**

ही ऑर्डर दाखविलेलीच नाही.

(सभागृहात गोंधळ.)

**मिलन म्हात्रे :-**

ही जमिन गेली तेव्हा तुम्ही गप्प बसलात. तुम्ही कोर्टात का गेले नाही तुम्हाला कोणी अडकवले होते का? तुम्ही जायचे होते.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, ते झाले पाहिजे आणि ते लवकरात लवकर झाले पाहिजे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील आत्ता जेवढे स्टँडींगचे सभासद बोलले की, आमचा निधी द्या. समजा आपण बी.ओ.टी. वर द्यायचे......

**मिलन म्हात्रे :-**

काही द्यायचे नाही. लोक डोनेशन द्यायला तयार आहेत.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, सहा लाख दिल्यानंतर तीस लाखाचे काय करायचे ते सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाने हे क्लीअर करायला पाहिजे होते. तुमच्या मा. सभापतींनी ते निर्णय घेतले होते. सगळ्यांची नावे लागणार आहेत. मग तुम्ही कशासाठी विरोध करता?

**शरद पाटील :-**

विरोध करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

अधिका-यांनी सुद्धा मला धडधडीत विचारलेले आहे, मा. आयुक्त वगैरे अधिका-यांनी की, तुमच्यामुळे साडेतीन करोड गेले. हे शब्द मा. आयुक्तांचे आहेत, श्री. सुदामराव गायकवाड. तुमचे श्री. मिलिंद वाणी गेले. त्यांनी सुद्धा सांगितले आहे. आम्ही उच्च न्यायालयातून ऑर्डर आणली म्हणून ती जागा राहिली. नाही तर कोणीतरी मनूभाई, टनूभाई यांनी सगळे टॉवर खाउन टाकले असते. हे लक्षात घ्या. हसू नका टिंगल टवाळ्या करू नका. तुमच्या हॉस्पीटलला लोकवस्तीमध्ये एकही रिझर्व्हेशनची जागा नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही सांगता की, ही जागा आपण कोणालाही बी.ओ.टी वर देउ शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

बी. ओ. टी. तत्वावर द्यायला कोणाची टाप लागली आहे? बी. ओ. टी. वर करून तर बघा. मग माझ्याशी गाठ आहे. साहेब, तिकडे शवागृह दाखवले नव्हते. आम्ही तो मे. आर्किझमकडून मॉडीफाय करून घेतला. त्यानंतर शवागृहाची जागा दाखवली. श्री. आर.डी. शिंदे साहेब, स्वतः बघायला आले. त्यानंतर ते प्लॅनिंग निराळे केले गेले आणि त्यानंतर आपला प्लॅन मंजुर झाला आहे. आपले सगळे व्यवस्थित आहे. उगाच विरोध करायचा म्हणून करायचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

६ लाख उन्होने दिया तो ३० लाख की प्रशासकिय मंजुरी लेनी पडेगी ना?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी तुम्हाला एक पिटीशनर म्हणून सांगतो, मिलन म्हात्रे म्हणून बोलत नाही. प्रशासनाने सहा आठवड्यामध्ये सदर हॉस्पीटलचे काम सुरू करायला पाहिजे होते, अशी १८ नोव्हेंबर २००६ ची ऑर्डर आहे. त्यानंतर आमच्या मा. आयुक्तांनी जवळ जवळ सहा सात महिने जागा ताब्यात घेण्याकरिता घालवले. त्यावेळेला कोणीही काही बोलले नाहीत मी गप्प होतो कारण माझे ॲडव्होकेट बोललेले की आपल्याला एवढ्या लवकर काही करायचे नाही. पण त्या हॉस्पीटलची केस परत रिओपन करायची रिमेडी हायकोर्टाने मला ठेवलेली आहे. मला कुठल्याही अधिका-याला त्रास द्यायचा नाही. जे व्यवस्थित चालले आहे ते चालू द्या. तुम्ही याच्यामध्ये कुठेही काही करू नका. पब्लिकचे काम आहे. सगळ्या नगरसेवकांच्या इकडे जे लोक राहतात ते उद्या त्या हॉस्पीटलमध्ये जाणार आहेत. ती माझी स्वतःची खाजगी प्रॉपर्टी नाही.

**मा. सभापती :-**

विषय ६७ घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, निर्णय काय झाला.

**मा. सभापती :-**

निर्णय दिला त्यांनी ठराव वाचला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ठरावावर सुचक आणि अनुमोदक हे अजुनपर्यंत झालेले नाही.

**मा. सभापती :-**

झालेले आहे. त्यांनी अनुमोदन दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमचे आत्ता काय म्हणणे आहे. याच्यामध्ये बाकीचे तीस लाख हे कोण देणार?

**मिलन म्हात्रे :-**

नगरपालिकेच्या फंडातुन जाणार.

**मा. आयुक्त :-**

नगरपालिकेचा फंड हा नगरपालिकेचा असतो. त्याचे फक्त सबहेड किंवा जे सब पॉकेट आहेत. जसे माझ्या खिशाला इकडे एक पाकीट आहे. तसे नगरपालिका नगरसेवक निधी असेल, वॉर्ड निधी असेल बेसिक निधी असेल, शेवटी पैसा एकच आहे. त्यामुळे माझी समितीला विनंती आहे की, हा ठराव पास केल्यानंतर श्री. म्हात्रे साहेब, त्यांचे पाच सहा लाख देतील. आणखिण कोणाला द्यायचे ते देतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझा पुढच्या वर्षाचा नगरसेवक निधी घ्या.

**मा. आयुक्त :-**

कोणाचाही असला तरी शेवटी पैसा एकच आहे.

**मा. सभापती :-**

३१ तारखेपर्यंत ज्यांना द्यायचा असेल त्यांनी द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझा नगरसेवक निधी घ्या म्हणून मी आज डिक्लेअर करतो.

**मा. सभापती :-**

एक लेखी लेटर लिहून द्या.

**शरद पाटील :-**

साहेब, त्याच्यावर स्टँडींगवाल्यांची नावे येतील का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सर्व नगरसेवकांना माहिती करून द्या.

**मिलन म्हात्रे :-**

.या सगळ्यांनी एकतर पावणे दोन वर्ष कोणी दिला नाही. आत्ता जागे झाले आहेत. तुम्ही द्यावे.

**मा. आयुक्त :-**

आपण असे करू की अकाउन्ट शाखेचे काही ऑब्जेक्शन नसेल तर फायनान्शीअल इअर २००६-०७, २००७-०८ याचा घोळ मिटवून आम्ही नगरसेवक निधी पुढे करू.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, २००७-०८ चा बऱ्याचशा लोकांचा निधी वापरला गेला आहे. आता २००८-०९ चा कोणाला द्यायचा त्यांना देउ द्या. आम्ही कुठे कोणाला विरोध करतो. पण मी जे पत्र दिलेले आहे ते अगदीच टेक्नीकल दिले आहे. १ एप्रिल २००७ ला माझे पत्र आहे. ऑर्डर आल्यानंतर माझे पत्र आहे की, पुढच्या ह्या स्ट्रक्चर करिता माझे हे असावे. मी चुकीचे काय केले आहे?

**शरद पाटील :-**

साहेब, हा ठराव मांडला त्याच्यावर तुम्ही रूलिंग द्या आणि स्थायी समितीच्या सगळ्या सदस्यांनी नावे त्याच्यावर येतील.

**मिलन म्हात्रे :-**

ती तर लावणारच आहेत. तुमचे ब्रीज बांधतात, स्ट्रक्चर होते, हॉस्पीटल होते. आम्ही नावाकरिता बोलतच नाही. मी माझ्या पत्रात कुठे दिले आहे की, मी हे सहा लाख रू. देतो. त्याच्यावर माझे नाव छापा. तुम्ही भलतीकडे विषय कुठे घेउन गेले?

**मा. सभापती :-**

सचिवांनी जरा लक्ष द्यावे की, आपल्या स्टँडींगच्या सर्व सभासदांची नावे आली पाहिजेत.

**मिलन म्हात्रे :-**

बाकीच्या बोर्डाचे काय?

**मा. आयुक्त :-**

आयुक्तांचे नको. बाकी सगळ्यांची नावे टाका.

**मिलन म्हात्रे :-**

कोनशीला ज्याचे भुमिपुजन होते जी गर्व्हमेंटच्या पी. डब्ल्यु. डी. डिपार्टमेंटमध्ये तुमची जुनी पद्धत आहे. ती ही पद्धत आहे त्यानुसार तुमच्या प्रशासनाच्या वतीने तुमचे नाव, शहर अभियंत्याचे नाव, हे सगळे येतेच. त्यानंतर आर्किटेक्टचे सुद्धा येते. आणि बाकीची कोणाची तुम्हाला टाकायची आहेत तो ठराव आहे आपल्याकडे ठराव आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही म्हणालात की, त्याच्यावर स्टँडींगच्या मेंबरची नावे टाका. तशी टाकता येतात. का ते विचारा. नाहीतर इतर नगरसेवक बोलतील की, आमची नावे का नाहीत? त्याचा खुलासा करा.

**मा. सभापती :-**

येतात.

**दिपक खांबित :-**

नावाबाबत आपला मा. महासभेत ठराव झाला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

त्या हॉस्पीटलमध्ये काय पाहिजे, काय नसावे, कशाचे असावे याचे धोरण ठरवा. नावाकरिता दोन तास मारामारी चालली आहे.

**शानु गोहिल :-**

मा. सभापती साहेब, ठराव तो अब करेंगे। जब हॉस्पीटल तयार हो जाएगा तब हम लोग नही रहेंगे तो हमारा नाम नही आयेगा।

**मा. सभापती :-**

विषय ६७ घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण ६६ चा ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, आजचा जो निर्णय झालेला आहे. आपले ८५ नगरसेवक आहेत. त्यांना सर्वांना आजच्या मिटींगच्या संदर्भामध्ये पत्र जाउ द्या की, असा असा निधी देतात. तुमची इच्छा असेल तर द्यावे. उद्या आम्हाला सांगायला नको की, तुम्ही आम्हाला कळवले नाही.

**दिपक खांबित :-**

फक्त नगरसेवक निधी.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही दोन्ही मागा.

**दिपक खांबित :-**

प्रभाग निधी नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रभाग निधी का नाही? मा. आयुक्त साहेब, एक लक्षात घ्या कायद्यात तरतुद आहे. बरोबर आहे. पण शहरामध्ये असे बरेचसे वॉर्ड आहे की, जिकडे काम करण्याची काही राहीलेच नाही. रस्ते झाले, गटारे झाले, बिल्डींग उभ्या आहेत. अशातला तुमचा निधी जर लॅप्स होत असेल तर तो तुम्ही का घेउ नये?

**मा. आयुक्त :-**

जर सगळ्या नगरसेवकांनी नगरसेवक निधीमधूनच ३६ लाखाची भरती होत असेल तर प्रभाग निधी घेण्याची आवश्यकता नाही.

**मिलन म्हात्रे :-**

३६ सांगत नाही. मी तर म्हणतो हॉस्पीटलला पण घ्या. विषयांतर करू नका. त्याने काय होते, म्हणजे ते व्यवस्थित प्लॅनिंग करून माझा प्रभाग निधी ३१ मार्च पर्यंत कुजवायचा हे धंदे आहेत. तो माझा आरोप आहे. तुम्ही वाद घालायचा कशाला? तुम्हाला द्यायचा की नाही एवढे बोला.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आम्ही यांचा प्रभागनिधी कुजवायच्या गोष्टी करत नाही. यांनी मांडलेले बरोबर असेल तर आम्हाला चांगले आहे म्हणून आम्ही सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना नाकारू द्या तुम्ही पत्र द्या.

**प्रकरण क्र. ६६ :-**

भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल येथे शवविच्छेदन गृह बांधणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे. (मा. उच्च न्यायालयाचे आदेश)

**ठराव क्र. ५२ :-**

भाईदर (प) टेंभा हॉस्पीटल येथे शवविच्छेदन गृह बांधणे कामी मा. श्री. मिलन म्हात्रे नगरसेवक हयांनी आपल्या **सन २००७-०८** या वर्षाच्या नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी मधून मागणी केलेली आहे. सदर निधी रु. **६,८६,०००/-** एवढा शिल्लक आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक **रु. ३६,२२,८६५/-** एवढया रक्कमेचे तयार करण्यात आलेले आहे. भाईंदर (प) हॉस्पीटल बांधणे या लेखाशिर्षात उर्वरीत खर्चाकरीता तरतूद केलेली आहे. तरी सदर अंदाजपत्रकास व निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन व. म्हात्रे.** **अनुमोदक :- श्री. गणेश गो. शेट्टी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७, भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल सिटी सर्व्हे क्र. ७५९, ७६० ते ७७१ या जागेत उर्वरित कुंपणभिंत बांधणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे. (मा. उच्च न्यायालयाचे आदेश)

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल येथील सिटी सर्व्हे क्र. ७५९, ७६० ते ७७१ या जागेत कुंपणभिंत बांधणे कामाचे कार्यादेश मे. ललित इंटरप्रायजेस यांना दि. २४/०१/२००८ रोजी दिलेले आहेत. सदर कुंपणभिंतीचे काम १४५.०० मी. लांबीचे होत असून उर्वरीत २५०.०० मी. लांबीची आर.सी.सी. कुंपणभिंतीचे काम करणेसाठी एकूण रु. ३९,७८,३८२/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर आर.सी.सी. कुंपणभिंतीच्या खर्चाकरीता भाईंदर (प.) हॉस्पीटल इमारत बांधकाम या लेखाशिर्षाखाली पुरेशी तरतुद केल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकास व निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**शानु गोहिल :-**

अनुमोदन आहे.

**दिपक खांबित :-**

याच्यामध्ये आपण आर.सी.सी. आणि दगडी असे करेक्शन करून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. आर.सी.सी च पाहिजे. आम्हाला लॉंग लाईफ पाहिजे आता नगरसेवक निधीतून कामे झालेली. उंदरानी पोखरून भिंती कोसळल्या. त्याला फक्त दोन वर्षे झाली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, याच्यामध्ये जरा खुलासा करावा. आपण पहिले १४५ मीटर लांबीची कुंपणभींत प्रस्तावित केली होती आणि हे २५० वाढीव काम आहे. जेव्हा हे हॉस्पीटल ताब्यात आले. तुमच्याकडे लेआउट होते. त्यावेळी तुम्ही मोजमाप घेतले नाही काय?

**दिपक खांबित :-**

घेतले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग २५० मीटर का राहिली?

**दिपक खांबित :-**

साहेब, अगोदर जे एस्टिमेट होते ते दगडी बांधकामाचे घेतले होते. त्यानंतर.....

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही सुचना केली की, दगडी बांधकाम करू नका. आर.सी.सी. करा. जेणे करून लॉंग टाईम एकदाच खर्च होतो. परत परत मेन्टेनन्स राहत नाही.

**दिपक खांबित :-**

त्यावेळी जेव्हा आपले एस्टीमेट सॅन्क्शन झाले त्यावेळेला श्री. गायकवाड साहेबांकडे श्री. म्हात्रे साहेबांनी पत्र देउन आपली चर्चा झाली. त्यावेळी श्री. गायकवाड साहेब बोलले की, यांच्या सुचनेनुसार तुम्ही आत्ता जे मंजुर झाले त्याच्यात आर.सी.सी. करून घ्या. आणि पुढे आर.सी.सी करा. त्यानुसार पुन्हा रिवाईज एस्टीमेट करून पुन्हा मंजुरीला आणले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही या टिपणीमध्ये उल्लेख केला पाहिजे होता. जी गोष्ट तुम्ही आता दगडी बांधकामाच्या ठिकाणी आर.सी.सी. बांधकाम केले म्हणून हे २५० मिटर वाढीव काम झालेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

पण लांबी कशी वाढणार?

**शरद पाटील :-**

दगडी करा किंवा आर.सी.सी. करा, लांबी कशी वाढते?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

काम वाढले, आर.सी.सी. वाढले, कशामुळे वाढले आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मला तुम्ही सांगा. एखादे टेंडर निघते. त्याचे एस्टीमेट बनते नंतर टेंडर निघते आणि स्टॅंडींग कमिटी त्याला मंजुरी देते आणि हे लोक परस्पर विदाउट मंजुरी चेंज करतात. तुम्ही आमची परमिशन का घेतली नाही?

**प्रशांत पालांडे :-**

पण लांबी कशी वाढेल?

**मिलन म्हात्रे :-**

ते जे कॉस्ट एस्टीमेट होते. त्याची हाईट आपण जास्त घेतली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे आमचे सन्मा. सदस्य विदाउट टेक्नीकल माणूस, ते सांगतात की, दगडी बांधकाम करू नका. आर. सी. सी. करा. आपल्याला हे भविष्यासाठी चांगले आहे आणि मग हे इंजिनियर, डिप्लोमा होल्डर, सिव्हील इंजिनिअर यांना कळत नव्हते. तेव्हा त्यांनी दगडी बांधकामाचे एस्टीमेट का दिले? आर. सी. सी. का केले नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

परत स्टँडींगमध्ये का आणले नाही?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तेव्हा त्यांना कळत नव्हते का? हे टेक्नीकल इंजिनिअर एक्स्पर्ट आहेत ना?

**मा. सभापती :-**

एक्स्पर्टचा सवाल नाही. आपल्याला किती खर्च करायचा आहे. हे प्रशासन पहिले बघेल की, आपल्याला कमीत कमी खर्च आपला सुझाव घेतील तर वेगळी प्रोसिजर होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आर.सी.सी. टिकेल असे लोकांचे म्हणणे आहे ना?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, रेल्वेची सगळी बांधकामे आर.सी.सी. मध्येच चालली आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आमचा प्रश्न आहे की, २५० मिटरची लांबी उर्वरित कशी राहिली?

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने सांगतो, याच्यामध्ये १४५ मीटर बांधकाम आहे की २५० मीटर आहे? दगडाचे बांधकाम सुरू आहे की विटांचे सुरू आहे? आत्ता आपल्याला आर.सी.सी. चे करायचे आहे. मग पहिले कसे आहे की, पहिलेसुद्धा आर.सी.सी. चे सुरू आहे. सध्या दोन्ही एक्झीक्युटीव्ह इजिनियर आहेत, जे आधीचे प्रभारी होते व आत्ताचे नवीन, त्या दोघांनाही सध्या काम एक्झॅक्टली आर.सी.सी.चे सुरू आहे की दगडाचे सुरू आहे याची माहिती नाही.

**मिलन म्हात्रे :-**

असे कोण बोलले?

**मा. आयुक्त :-**

हे दोघेजण.

**मिलन म्हात्रे :-**

ते स्वतः माझ्याबरोबर सहा वेळा साईटवर आले आहेत. असे खोटे काय बोलता? अशाने वाद होतात. ते माझ्याबरोबर सहा वेळा साइटवर आले आहेत. ते समोर उभे आहेत. त्यांना विचारा तुमचे श्री. रणदिवे साहेब, दररोज दहा वाजता जातात.

**मा. आयुक्त :-**

श्री. म्हात्रे साहेब, त्यांचे असे म्हणणे आहे की, या समितीनेच या कामाला पुढील मंजुरी दिली होती.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, बेकायदेकशीर काही झालेले नाही.

**मा. आयुक्त :-**

फक्त आर.सी.सी. मंजुरी एक्सची होती तिकडे वायचे काम झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही तुमच्या बांधकाम खात्याला स्ट्रीक्टली एक वॉर्निंग द्या. कारण आत्ता दगडी बांधकाम सगळीकडे बंद झालेले आहे. आत्ता सिडको, बाजुला वसईला छोट्या छोट्या महापालिका आहेत. तिकडची गटारे जाउन बघा. छोटी पडदी असते. गटाराचा स्पेस जास्त मिळतो. चांगले बांधकाम राहते. वसई - विरारला फिरून बघा. सिडकोचे काम किती चांगले आहे. नवी मुंबईला सिडको सगळे आर.सी.सी. करते. थोडा जास्त खर्च येतो. पण तो लाँग लाईफ आहे. साहेब, माझ्या वॉर्डमध्ये २००० साली नाले झालेले आहेत. तुम्ही येउन बघा. त्याचा अजुन एक कपचापण निघालेला नाही. म्हणून आम्ही सजेस्ट केले. तुम्ही टेक्नीकल आहात. तुम्ही बघा आणि मग त्यांनी ते रेड्युस केले आणि बांधून घेतले.

**मा. आयुक्त :-**

माझी समितीला विनंती आहे. आपण दररोज ट्रेनने येतो जातो. सध्या वेस्टर्न रेल्वे आणि सेंट्रल रेल्वे, असे सिमेंटचे पिलर उभे करते. त्याला मध्ये खाचा असतात आणि ते त्याच्यामध्ये आर.सी.सी. स्लॅब टाकतात. ते आणखीन स्वतात पडेल.

**मिलन म्हात्रे :-**

पण ते कमजोर आहेत. त्या प्लेट टाकतात ते कमजोर आहेत.

**शरद पाटील :-**

रेल्वेने ते सुद्धा तोडून आर.सी.सी. करायला लावले.

**मा. आयुक्त :-**

आर.सी.सी. चालत असेल तर आपण आर.सी.सी. करू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय पुढील सभेमध्ये, संपुर्ण माहिती, कारण आम्हाला चाळीस लाखाची वाढ द्यायची आहे. साधी नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आम्हाला हे जरा टेक्नीकली समजावून सांगा.

**मा. आयुक्त :-**

माझी. श्री. म्हात्रे साहेबांना विनंती आहे की, आपला हा जो २५० मीटर आर.सी.सी. चा प्रस्ताव आहे. तो पुर्वीचा जर १४५ चा आर.सी.सी. चा सुरू असेल. तर मग सगळेच आर.सी.सी. चे होईल मग चांगले राहील.

**मिलन म्हात्रे :-**

आपली सुरूवातच आर.सी.सी. ची झाली आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य श्री. म्हात्रे साहेब, आपल्याला समितीला असे सांगावे लागेल की, पूर्वी समितीने असा ठराव केला होता. त्याच्यामध्ये दगडी बांधकामाचे एस्टीमेट होते.

**मिलन म्हात्रे :-**

गोषवारा कोणी बनवला? प्रशासनाने त्याच्यात माझी सही नाही किंवा काउंटर सही नाही.

**मा. आयुक्त :-**

मान्य करतो. मी हे प्रशासनाच्या वतीनेच सांगू इच्छितो की, आत्ता असे दिसते की, पूर्वी ह्याच समितीने १४५ मीटरचे काम मंजुर केले होते. ते फक्त मॅशनरी बांधकामाचे होते. नंतर मध्यंतरी श्री. म्हात्रे साहेब किंवा कोणीही आले तरी प्रशासन चांगल्या सुचना ॲक्सेप्ट करणार. नाही म्हणत नाही. त्यामुळे प्रशासनाने किंवा त्यावेळेच्या मा. आयुक्तांनी असे सांगितले की, सुचना चांगली आहे. परमनन्ट पाहिजे असेल तर ते एस्टीमेट बदलून घ्या. नवीन करा. तर आत्ता समितीने त्याची नोंद घ्यावी की, आत्ता पहिल्या १४५ सह हे २५० असे एकत्रित हे एस्टीमेट आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, टोटल कुंपण भिंतीची लांबी किती ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

२५० प्लस १४५.

**प्रशांत पालांडे :-**

मग पुर्वी १४५ चे काम कसे मंजुर केले?

**शिवाजी बारकुंड :-**

पूर्वी आपल्या बजेटमध्ये तरतुद नव्हती. म्हणून आपण पार्टमध्ये घेतले होते.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे १४५ पार्ट झाला का?

**शिवाजी बारकुंड :-**

होय १४५ पार्ट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तो पार्ट वन झाला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही चुकीचे म्हणता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब इकडे सर्व चुकीची माहिती आहे.

**प्रशांत पालांडे :-**

कुंपणभिंतीची टोटल लांबी किती आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे खोटे बोलतात. हे चुकीचे बोलतात. त्यांनी पहिला असा खुलासा केला की, टेंडर काढले आणि त्यानुसार आम्ही दगडी बांधकाम सुरु केले. दगडी बांधकाम सुरु असताना एक सन्मा. सदस्य गेले. त्यांनी आयुक्तांना सांगितले की, दगडी बांधकाम करु नका. आर.सी.सी. करा. लगेच कमिशनरने त्यांना सांगितले की, आर.सी.सी. करा आणि दगडी बांधकामाचा रेट वेगळा असतो. दगडी बांधकाम स्वस्तामध्ये होते आणि आर.सी.सी. चा रेट वेगळा असतो. दगडी बांधकाम स्वस्तामध्ये होते आणि आर.सी.सी. कॉस्टली होते आणि म्हणून यांनी ताबडतोब आर.सी.सी. सुरु केले. आणि त्यावेळी ॲप्रॉक्सीमेटली ३० लाखाचे टेंडर होते.

३० लाखाची क्वॅान्टीटी होईपर्यंत त्या कॉन्ट्रॅक्टरने आर.सी.सी. काम पूर्ण केले. त्याच्यानंतर ते काम थांबले आणि यांनी परत तो विषय स्थायीपुढे आणला की, आत्ता परत २५० मीटरचे आर.सी.सी. बांधकाम करायचे आहे. त्याच्यासाठी एवढा निधी लागणार आहे. तरी तुम्ही ही आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी द्या. साहेब, हा असा सब्जेक्ट आहे.

**मा. आयुक्त :-**

मान्य आहे. पण आत्ता अर्धे बांधकाम जर आर.सी.सी. झाले असेल तर उर्वरीत पूर्ण करावेच लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आमचा याला विरोध नाही. आमचा विरोध अशासाठी आहे की, तुम्ही हे टेक्निकल स्टाफ, इंजिनिअर आहेत, बी.ई. सिव्हील, बी.ई. डिप्लोमा, मग ह्यांनी अगोदर सुरुवातीला दगडी बांधकामाचे टेंडर का काढले? आणि त्यांना जर करायचे होते मग त्यांनी मा. स्थायी समितीपुढे आणायचे होते की, सन्मा. सदस्यांनी असे सुचवलेले आहे. आपण दगडी बांधकामाचे एस्टीमेट तयार केले होते आणि त्याच्यामुळे आत्ता आपली कॉस्टींग वाढलेली आहे. आपले एवढेच काम होणार आहे आणि आपल्याला आत्ता एस्टीमेट चेंज करायचे आहे. तरी कृपया आपण मंजुरी द्यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ललीत इंटरप्रायजेसला दिलेला कार्यादेश, त्याची माहिती आणि बाकीच्या कामाची संपूर्ण माहिती हे तुम्ही पुढच्या मा. स्थायीमध्ये आणा. आम्ही त्याला मंजुरी देउ.

**प्रशांत पालांडे :-**

कॉस्टींगमध्ये किती फरक पडेल ते पण आम्हाला कळले पाहिजे. दगडी बांधकाम आणि आर.सी.सी. च्या कॉस्टमध्ये किती फरक पडेल ते पण कळले पाहिजे.

**मा. सभापती :-**

ठराव झालेला आहे. मी ठराव मंजुर करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण आम्ही बोलतो आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना काय पाहिजे ते पुढच्या मिटींगला द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

काय ठराव मंजुर करता?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याला आमचा विरोध आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही ठराव मांडतो

**मिलन म्हात्रे :-**

विरोध नोंदवून घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

उपरोक्त विषयान्वये यापूर्वी दिनांक २४/०१/२००८ रोजी दिलेले कार्यादेश व त्यावेळी सदर ''कुंपणभिंत'' काढणे कामी प्रशासनातर्फे तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात १४५ मीटर लांबीचे ''कुंपणभिंतीचे'' काम प्रस्तावित केले असताना २५०.०० मी. लांबीचे आर.सी.सी. कुंपणभिंतीचे काम कशामुळे वाढले व यापूर्वी दिनांक २४/०१/२००८ रोजी मेसर्स ललित इंटरप्रायझेस यांना दिलेल्या कामाचा कार्यादेश बाबतचा कामाचा तपशिल स्थायी समिती पुढे पुढील सभेत हा विषय विषयपटलावर आणावा.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, याच्यावर मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव, सुचक श्री मिलन म्हात्रे आहेत आणि अनुमोदक सौ. शानु गोहिल आहेत. दुसरा ठराव, सुचक श्री. प्रशांत पालांडे आणि अनुमोदक श्री. ओमप्रकाश अग्रवाल आहेत. नियमानुसार दुसरा ठराव मी प्रथम मतदानास घेतो. दुसरा आलेला ठराव मी वाचून दाखवत आहे. सुचक श्री. प्रशांत पालांडे आणि अनुमोदक श्री. ओमप्रकाश अग्रवाल उपरोक्त विषयान्वये यापूर्वी दिनांक २४/०१/२००८ रोजी दिलेले कार्यादेश व त्यावेळी सदर ''कुंपणभिंत'' काढणे कामी प्रशासनातर्फे तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात १४५ मीटर लांबीचे ''कुंपणभिंतीचे'' काम प्रस्तावित केले असताना २५०.०० मी. लांबीचे आर.सी.सी. कुंपणभिंतीचे काम कशामुळे वाढले व यापूर्वी दिनांक २४/०१/२००८ रोजी मेसर्स ललित इंटरप्रायझेस यांना दिलेल्या कामाचा कार्यादेश बाबतचा कामाचा तपशिल स्थायी समिती पुढे पुढील सभेत हा विषय विषयपटलावर आणावा. या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी आपले हात वर करायचे

आहेत. (हात वर करुन मतदान घेण्यात आले.) मी दुसऱ्या ठरावाचे वाचन करतो. सुचक श्री मिलन म्हात्रे, अनुमोदक सौ. शानु गोहिल भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल येथील सिटी सर्व्हे क्र. ७५९, ७६० ते ७७१ या जागेत कुंपणभिंत बांधणे कामाचे कार्यादेश मे. ललित इंटरप्रायजेस यांना दि. २४/०१/२००८ रोजी दिलेले आहेत. सदर कुंपणभिंतीचे काम १४५.०० मी. लांबीचे होत असून उर्वरीत २५०.०० मी. लांबीची आर.सी.सी. कुंपणभिंतीचे काम करणेसाठी एकूण रु. ३९,७८,३८२/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर आर.सी.सी. कुंपणभिंतीच्या खर्चाकरीता भाईंदर (प.) हॉस्पीटल इमारत बांधकाम या लेखाशिर्षाखाली पुरेशी तरतुद केल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकास व निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. हा पहिला ठराव मांडला होता. त्याच्या विरोधात मत घेतले नव्हते. ते आत्ता एकदमच घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचा ठराव झाला. आम्ही विरोध का करतो? आमचा विरोध नोंदवून मग आम्ही मतदान करणार. रेकॉर्डवर घ्या. यांचा मांडलेला ठराव सदर कामात प्रलंब करण्याकरीता आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

कोर्टाच्या निर्णयाला बंधन आहे. निर्णयाच्या बंधनाला तुम्ही विरोध करता. तुम्ही माझे नोंदवून घ्या. मी ॲज पर कोर्ट ऑर्डर बोलतो. सहा आठवड्यात कामाला सुरुवात करायची होती. पावणे दोन वर्षे झाली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोर्टाची भिती दाखवायची नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ऑर्डर वाचून घ्या. भिती कशाला दाखवायची? कोर्टाच्या निर्णयानुसार सदर काम सहा आठवड्यात पूर्ण करायचे होते. सदर बाबतीत कुठलीही कॉस्ट वाढलेली नाही. प्रत्यक्ष काम झालेले आहे. त्याकरीता आमचा विरोध आहे.

**नगरसचिव :-**

सुचक श्री. प्रशांत पालांडे व अनुमोदक श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या सुचनेचा त्यात उल्लेख करा. मग आम्ही विरोध करणार.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ठरावावर मतदान प्रक्रिया चालू आहे. त्याच्यामध्ये तुम्ही कुठली चर्चा करता?

**नगरसचिव :-**

जे विरोधात आहेत त्यांनी हात वर करायचे आहेत. (हात वर करुन मतदान घेण्यात आले.) तटस्थ कोणीही नाही. दुसरा ठराव जो मांडलेला आहे, सुचक श्री. मिलन म्हात्रे, अनुमोदक सौ. शानु गोहिल, या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (हात वर करुन मतदान घेण्यात आले.) या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. नियमानुसार मा. मा. सभापती ह्यांचे कास्टींग वोट आहे. ते त्यांनी कुठे द्यायचे हे जाहिर करायचे आहे.

**मा. सभापती :-**

ठराव क्र. ०१, श्री. मिलन म्हात्रे यांच्यासाठी मी माझे मत जाहिर करतो. श्री. मिलन म्हात्रे यांचा ठराव वाचून कायम.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन वसंत म्हात्रे यांचा ठराव मी वाचून दाखवत आहे. भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल येथील सिटी सर्व्हे क्र. ७५९, ७६० ते ७७१ या जागेत कुंपणभिंत बांधणे कामाचे कार्यादेश मे. ललित इंटरप्रायजेस यांना दि. २४/०१/२००८ रोजी दिलेले आहेत. सदर कुंपणभिंतीचे काम १४५.०० मी. लांबीचे होत असून उर्वरीत २५०.०० मी. लांबीची आर.सी.सी. कुंपणभिंतीचे काम करणेसाठी एकूण रु. ३९,७८,३८२/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर आर.सी.सी. कुंपणभिंतीच्या खर्चाकरीता भाईंदर (प.) हॉस्पीटल इमारत बांधकाम या लेखाशिर्षाखाली पुरेशी तरतुद केल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकास व निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**मा. सभापती :-**

ठराव बहुमताने मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ६७ :-**

भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल सिटी सर्व्हे क्र. ७५९, ७६० ते ७७१ या जागेत उर्वरित कुंपणभिंत बांधणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

**ठराव क्र. ५३ :-**

भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल येथील सिटी सर्व्हे क्र. ७५९, ७६० ते ७७१ या जागेत कुंपणभिंत बांधणे कामाचे कार्यादेश मे. ललित इंटरप्रायजेस यांना दि. २४/०१/२००८ रोजी दिलेले आहेत. सदर कुंपणभिंतीचे

काम १४५.०० मी. लांबीचे होत असून उर्वरीत २५०.०० मी. लांबीची आर.सी.सी. कुंपणभिंतीचे काम करणेसाठी एकूण रु. ३९,७८,३८२/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर आर.सी.सी. कुंपणभिंतीच्या खर्चाकरीता भाईंदर (प.) हॉस्पीटल इमारत बांधकाम या लेखाशिर्षाखाली पुरेशी तरतुद केल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकास व निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- सौ. शानु गोहिल.**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. मॉरस रॉड्रिक्स | १ | श्री. ओमप्रकाश अग्रवाल | १ | |
| २ | श्री. मिलन वसंत म्हात्रे | २ | श्री. शरद पाटील | २ | |
| ३ | श्री. एस. ए. खान | ३ | श्री. प्रशांत पालांडे | ३ | |
| ४ | सौ. शानू गोहिल | ४ | श्री. टेरी परेरा | ४ | |
| ५ | सौ. सुनिता पाटील | ५ | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | ५ | निरंक |
| ६ | सौ. नयना म्हात्रे | ६ | श्री. राजू भोईर | ६ | |
| ७ | श्री. गणेश शेट्टी, | ७ | श्री. ध्रुवकिशोर पाटील | ७ | |
| ८ | श्री. तुळशीदास म्हात्रे | ८ | श्री. प्रकाश ठाकुर | ८ | |
| | कास्टींग वोट | | | | |
| ९ | श्री. मॉरस रॉड्रीक्स | | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६८, निविदांना मंजुरी देणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आत्ता जे कलम ७३(क) दिले. हा नियम वाचून दाखवा.

**एस. ए. खान :-**

| **A.Ë.** | **kamaacao Àzokodaracao naaMva** | **zokodaranao saadr kolaolao dr** |
|---|---|---|
| 1 | imararaoD AarxaNa Ë.192¸193 maQyao r@tpoZI¸ SavaagaRh¸ vaacanaalaya¸ dvaaKanaa¸ p`Baaga kayaa-layaakrIta baaMQalaolyaa [maartImaQyao AaoTIsa kMpnaIcyaa daona p^saoMjar ilaFT (408 kg load) va ek sT/o@car ilaFT (1020 kg load) basaivaNao.<br>**1´ mao.parsa kMnsT/@Sana**<br>2´ mao.EaljaI kMnsT/@Sana<br>3´ mao.baalaajaI [nf`asT/@car | **$.29¸70¸000À¹**<br>$.31¸47¸000À¹<br>$.34¸90¸000À¹ |

varIla kamaIbaabat taMi~k sallaagaar mao.Aaica-Jama yaaMnaI AiBap`aya idlaolao Aahot va Rate Analysis nausaar dr tpasaNaI kolaI Aaho.

sadr kamaI mao.AaoTIsa [lao. yaaMnaa kama sau$ krNyaapuvaI- 30‰ Payment Advance Vavayaacao Aaho. tsaoca sadr izkaNaI [tr isavhIla vak- sauQda krNao AavaSyak Aaho. PWD LICENCE yaakrIta yaoNaara Kca- va Anya LIET PIT Kca- ApoxaIt Aaho. taMi~k sallaagaar yaaMnaI varIla p`maaNao $.29¸70¸000À¹ [t@yaa r@kmaocaI inaivada maMjaUr haoNaosa iSafarsa kolaolaI Aaho. varIla sava- baabaI ivacaarat Gaota

mao.parsa kMnsT/@Sana yaaMcyaa inaivadosa mauMba[- p`aMitk mahanagarpailaka AiQainayama 1949 cao klama 73 ³k´ nausaar maanyata doNyaat yaot Aaho. sadr kamaI zokodaracaI vaoLaovaoLI yaoNaarI doyako p`danaasa sauQda maanyata doNyaat yaot Aaho.

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर.

**प्रकरण क्र. ६८ :-**

निविदांना मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ५४ :-**

| A.Ë. | kamaacao Àzokodaracao naaMva | zokodaranao saadr kolaolao dr |
|---|---|---|
| 1 | imararaoD AarxaNa Ë.192¸193 maQyao r@tpoZI¸ SavaagaRh¸ vaacanaalaya¸ dvaaKanaa¸ p`Baaga kayaa-layaakrIta baaMQalaolyaa [maartImaQyao AaoTIsa kMpnaIcyaa daona p^saoMjar ilaFT (408 kg load) va ek sT/o@car ilaFT (1020 kg load) basaivaNao.<br>**1´ mao.parsa kMnsT/@Sana**<br>2´ mao.EaljaI kMnsT/@Sana<br>3´ mao.baalaajaI [nf`asT/@car | **$.29¸70¸000À¹**<br>$.31¸47¸000À¹<br>$.34¸90¸000À¹ |

varIla kamaIbaabat taMi~k sallaagaar mao.Aaica-Jama yaaMnaI AiBap`aya idlaolao Aahot va Rate Analysis nausaar dr tpasaNaI kolaI Aaho.

sadr kamaI mao.AaoTIsa [lao. yaaMnaa kama sau$ krNyaapuvaI- 30 ‰ Payment Advance Vavayaacao Aaho. tsaoca sadr izkaNaI [tr isavhIla vak- sauQda krNao AavaSyak Aaho. PWD LICENCE yaakrIta yaoNaara Kca- va Anya LIET PIT Kca- ApoxaIt Aaho. taMi~k sallaagaar yaaMnaI varIla p`maaNao $.29¸7000À¹ [t@yaa r@kmaocaI inaivada maMjaUr haoNaosa iSafarsa kolaolaI Aaho. varIla sava-baabaI ivacaarat Gaota mao.parsa kMnsT/@Sana yaaMcyaa inaivadosa mauMba[- p`aMitk mahanagarpailaka AiQainayama 1949 cao klama 73 ³k´ nausaar maanyata doNyaat yaot Aaho. sadr kamaI zokodaracaI vaoLaovaoLI yaoNaarI doyako p`danaasa sauQda maanyata doNyaat yaot Aaho.

सुचक :- श्री. एस. ए. खान. अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल.

ठराव सर्वानुमते मंजुर

ठराव वाचून कायम करण्यांत आला

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६९, मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, अवलोकन मंजुर केलेले आहे. या अवलोकना बद्दल मा. विरोधी पक्षनेते श्री. चंद्रकांत वैती यांनी बजेटच्या वेळी फार चर्चा केली होती. त्यानंतर अवलोकन कशा पध्दतीने आणायचे याची नोंद प्रशासनाने केली. यापुढे असे अवलोकन करताना प्रशासनाने विचार करावा.

**प्रकरण क्र. ६९ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची रंगरंगोटी करून दुरूस्ती कामे करणे व इतर सोळा कामे.

**ठराव क्र. ५५ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It करावयाच्या खालील कामांना maa.Aayau@t yaaMnaI maMjaUrI idlaolaI Aaho.

| A.Ë. | kamaacao Àzokodaracao naaMva | AMdaijat Kca- |
|---|---|---|
| 1 | imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka xao~atIla kaiSaimara yaoqaIla C~ptI iSavaajaI maharajaaMcyaa putLyaacaI rMgarMgaaoTI k$na du$stI kamao krNao.<br>**1´ mao.ivajaya iSargaaMvakr fa[-na AaT-sa**<br>2´ mao.QanaMjaya ko.mauQaaolakr<br>3´ mao.maalanakr AaT-sa\ sTuiDAao | **$.1¸58¸000À¹**<br>$.1¸70¸000À¹<br>$.1¸65¸000À¹ |
| 2 | ra[- smaSaanaBaUmaI yaoqao maaoTar pMp basaivaNao va kaiSaimara smaSaanaBaUmaI yaoqao ivaVut ifTIMga krNao.<br>**1´ mao.Aar.ko.[lao@T/Ik va@sa-**<br>2´ mao.nyau iflD<br>3´ mao.Samaa- [lao@T/Iklsa- | $.30¸823À¹<br>**AMdajap~kIya dranao**<br>6.00‰ jaast dranao<br>7.00‰ jaast dranao |
| 3 | Baa[-Mdr ³p.´ maQau Aga`vaala ha^spITla to saudamaanagar paNyaacaI TakI pya-Mt gaTaravar paola फाउडेंशन व इतर कामे करणे.<br>**1´ mao. Samaa- [lao@T/Iklsa-**<br>2´ mao.nyau iflD<br>3´ mao.Aar.ko.[lao@T/Ik va@sa- | $.49¸157À¹<br>**AMdajap~kIya dranao**<br>5.00‰ jaast dranao<br>3.00‰ jaast dranao |
| 4 | Baa[-Mdr ³p.´ yaoqaIla macCI maako-T yaoqao टायमर व पॅनल basaivaNao.<br>**1´ mao.nyau iflD**<br>2´ mao.Samaa- [lao@T/Iklsa-<br>3´ mao.Aar.ko.[lao@T/Ik va@sa- | $.40¸000À¹<br>**AMdajap~kIya dranao**<br>2.50‰ jaast dranao<br>4.00‰ jaast dranao |

| A.Ë. | kamaacao naava | AMdaijat Kca- | ijalha majaUr saaosaayaTIcao |
|---|---|---|---|

| | | | naava |
|---|---|---|---|
| 5 | ra.ma.Ë.8 varIla poNakrpaDa yaoqaIla DaMbarI rsto du$stI krNao. | $.3¸50¸000 À¹ | EamajaIvaI majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.SahapUr¸ ija.zaNao. |
| 6 | C~ptI iSavaajaI maharaja maagaa-varIla hTkoSa ]Vaoganagar yaoqaIla DaMbarI rsto du$stI krNao. | $.8¸00¸000 À¹ | gau$d<a majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. Ta.klyaaNa¸ ija.zaNao. |
| 7 | ra.ma.Ë.08 varIla imaragaaMva maunSaI kMpa}MD ra^yala ka^laoja ina%yaanaMd nagar mhaDa ka^mPlao@sa javaLIla pirsaratIla DaMbarI rsto du$stI krNao. | $.8¸15¸500 À¹ | klyaaNakarI majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.klyaaNa¸ ija.zaNao. |
| 8 | C~ptI iSavaajaI maharaja maagaa-varIla AlaknaMda [maartIpasaUna PlaoJaMT pak- “ef” [maartI pya-Mt caa DaMbarI rsta du$stI krNao. | $.5¸20¸000 À¹ | EaISaMBaaomahadova majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.ija.zaNao. |
| 9 | Baa[-Mdr pUva- paorvaala p^raDa[-ja to rSmaI hotla pya-Mt rsta tyaar krNao. | $.9¸92¸900 À¹ | mao.navajaIvana majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.maurbaaD¸ ija.zaNao. |
| 10 | mauQaa- p`Baaga Ë.27 yaoqaIla ËaMtI jyaaotI saaiva~Ibaa[- fulao ]Vana yaoqao gaoT la^mp va PlaimbaMga kama tsaoca poNakrpaDa saukava tlaava yaoqao PlaimbaMga kama krNao. | $.3¸87¸902 À¹ | mao.EamaijavaI majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.SahapUr¸ ija.zaNao. |
| 11 | Baa[-Mdr piScama yaoqaIla Ëa^sa gaaD-na yaoqaIla naanaa naanaI pak- yaoqao gaoT la^mp va ivaVut ifTIMga krNao. | $.90¸502À¹ | mao.EamaijavaI majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.SahapUr¸ ija.zaNao. |
| 11 | imararaoD pUva- sao@Tr 2 KoLacao maOdana va saa[-baabaa gaaD-na yaoqao PlabaIMga va AavaSyak kamao krNao. | $.89¸076À¹ | mao.EamaijavaI majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.SahapUr¸ ija.zaNao. |
| 12 | imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_ItIla manapacyaa mau#ya [maartIt¸ saBaagaRh¸ mau#ya laoKaiQakarI dalana va ilaFT | $.5¸00¸000 À¹ | mao.sairta majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.ija.zaNao. |

| | | | |
|---|---|---|---|
| | pIz yaa izkaNaI gaLtI p`itbaMQak ]paya yaaojanaa krNao. | | |
| 13 | imararaoD macCI maako-T to SaaMtI Saa^pIMga rsta du$stI krNao. | $.5¸00¸000 À¹ | mao.EaIgaNaoSa majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.ija.zaNao. |
| 14 | Baa[-Mdr ³pU.´ saa[- AaiSavaa-d¸ maorI gaaolD¸ saMskRtI ApaT-. prIsaratIla rsto du$stI krNao. | $.5¸89¸750 À¹ | mao. hirhroSvar majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.ija.zaNao. |
| 15 | Baa[-Mdr ³pU.´ saaonama saagar¸ EaI baalaajaI dSa-na¸ saa[- igata prIsaratIla rsto du$stI krNao. | $.9¸99¸050 À¹ | mao.Aaoma majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.ija.zaNao. |
| 16 | DaoMgarI taraoDI palaKaDI maQalla AMtga-t saI.saI. rsto du$stI krNao. | $.4¸73¸700 À¹ | saakDbaava majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-.ta.SahapUr¸ ija.zaNao. |
| 17 | Baa[-Mdr ³p.´ naoh$nagar va Saas~Inagar BaagaatIla saI.saI.rsto du$stI krNao. | $.3¸50¸000 À¹ | Sao[- ivaBaaga majaUr kamagaar sahkarI saMsqaa mayaa-. ta.SahapUr¸ ija.zaNao. |

varIla pOkI A.Ë. 1 to 4 yaa kamaakrIta zokodaraMnaI saadr kolaolyaa inaivada maQalla savaa-t kmaI dracyaa inaivada QaarkakDUna kama k$na GaoNyaasa va inaivadasa maa.Aayau@t yaaMnaI maMjaUrI idlaolaI Aaho. tsaoca A.Ë.5 to 17 hI kamao AMdajap~k dranao ijalha majaUr saaosaayaTI maaf-t k$na GaoNyaasa maa.Aayau@t yaaMnaI maMjaUrI idlaolaI Aaho. sadr kamaaMcao mauMba[- p`aMitk mahanagarpailaka AiQainayama 1949 cao klama 73 ³D´ nausaar Avalaaokna krNyaat Aalao.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, महानगरपालिका अधिकारी, व कर्मचारी वर्ग यांनी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास सहकार्य केल्या बद्दल मी सर्वांचे आभार मानतो व आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.१५ वा.**

**सही/-**

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका